गुरुवार, २१ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 21 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-129 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05




# शिक्षकांच्या मागणीसाठी अर्धनग्न आंदोलन

## जागृत पालक कृती विचारमंचचा एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम : जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उच्च माध्यमिक शाळेमध्ये वर्ग पाच ते दहामध्ये शिकविण्यासाठी 37 शिक्षकांची आवश्यकता असून फक्त 16 शिक्षक कार्यान्वित आहेत. त्यामुळे शिक्षक कमी असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे, या मागणी करीता मंगरूळपीर जागरूक पालक कृती समितीच्या वतीने बुधवारी सकाळी अकरा वाजता अर्धनग्न आंदोलन करण्यात आले.**

यावेळी गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या गंभीर शैक्षणिक समस्येविषयी जागृत पालक कृती मंचच्या वतीने दिनांक 4 डिसेंबर रोजी निवेदन दिले होते, परंतु आपल्या प्रशासनाने शिक्षक मिळण्यासाठी कोणतेही प्रकारचे पाऊल उचलले नसल्याने कृती पालक कृती मंच वतीने दिनांक 13 डिसेंबर दुसरे निवेदन स्मरणपत्र दिले व आमची मागणी पूर्ण झाल्यास आम्ही 20 डिसेंबरला अर्धनग्न आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. तरी आपल्या निर्णयाचे प्रशासनातर्फे कोणते उचित पाऊल उचलल्या नसल्यामुळे जागृत पालक कृती समितीच्या वतीने बुधवारी दिनांक 20 डिसेंबर रोजी अर्धनग्न आंदोलन करण्यात आले. तरी आपण पुढील तीन दिवसात शिक्षक नाही दिले तर 26 डिसेंबर 2023 रोजी जिल्हा परिषद माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे ताला ठोको आंदोलन करण्यात येईल. त्या पुढील होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात नमूद केल्यावर असून या निवेदनावर दशरथ पवारसह अनेक पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




# मुख्यमंत्री शिंदेंचे विधानसभेतील भाषण आरएसएसने दिलेला ड्राफ्ट : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात सध्या ऐरणीवर असलेल्या विविध समाजाच्या आरक्षणावर जातनिहाय जनगणना हाय पर्याय आहे. काँग्रेस पक्षाने त्यासंदर्भातील आपली भूमिका सभागृहात मांडली आहे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जातनिहाय जनगणनेला विरोध आहे. संघ व भारतीय जनता पक्षाला आरक्षणच संपवायचे आहे म्हणून महाराष्ट्रात वाद चिघवळला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत आरक्षणप्रश्नी केलेले भाषण हे भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिलेला ड्राफ्ट होता, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दुर्बल घटकांना आरक्षण देण्यासाठी जातनिहाय जनगणना हाच पर्याय आहे. शिंदे समितीचे काम फक्त कुणबी प्रणाणपत्र आहे का हे पाहण्याचे काम आहे ते कायमस्वरुपी काम नाही.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात म्हणाले की अनेक जाती आरक्षण मागत आहेत त्यासाठी आंदोलने सुरू आहेत त्या समाज घटकांना आरक्षण द्यायचे आहे.

# सहा वर्षीय शिवराज कापुरेने सर केले कळसूबाई शिखर

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** आपल्याला अतिशय सहजपणे मोठं होता येत नाही.काही तरी करून दाखविण्याची मनात विचार आला की सर्व काही सोपं होतं चालतं त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. काहीवेळेला अडचणींचा डोंगर सर करत असताना आपल्याला मनस्ताप होतो. आपण आहोत तिथून परत माघारी फिरावं, असे विचार आपल्या मनात येतात. नैराश्य येतं. पण या सगळ्यांवर मात करुन जो संयमाने संघर्ष करतो, परिस्थितीला सामोरं जातो, आणि मनात काही करुन दाखविण्याची विश्वास अडचणींसोबत दोन हात करत लढतो त्याचा विजय निश्चित असतो.

असा एक अतिशय आदर्श उदाहरण आपल्या लहान मुलांच्या डोळ्यांसमोर उभं केलंय. लोणार येथील सहा वर्षीय शिवराज सचिन कापुरे याने सहा वर्षीय सचिनने साधा-सोपा डोंगर नाही, तर चक्क महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर महाराष्ट्रातील एव्हरेस्ट म्हणून ओळखल्या जाणारं कळसुबाईचा शिखर सर केलाय.या आधी या चिमुकल्याने मसूरी येथील जॉर्ज एव्हरेस्ट शिखर सर केले आहे. यावेळी उपस्थित पर्यटकांनी शिवराज याने अवघ्या सहाव्या वर्षी केलेल्या केलेल्या कर्तबगारीची जल्लोश साजरा केला.शिवराजचे सर्व स्तरातून त्याच कौतुक होत आहे.



# ऊर्जा संवर्धन हे दैनंदिन जीवनाचे तत्त्व व्हावे : मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे

आधुनिक केसरी न्यूज


छत्रपती संभाजीनगर : ऊर्जानिर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशासह इंधनाचे साठे नजीकच्या भविष्यात संपतील. त्यामुळे ऊर्जासंवर्धन हे दैनंदिन जीवनाचे तत्त्व व्हावे, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी केले.

बुधवारी छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालयात आयोजित ऊर्जा संवर्धन सप्ताह समारोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून डॉ.केळे बोलत होते. ते म्हणाले की, ऊर्जा ही व्यापक संकल्पना असून, ज्यातून काहीही काम करता येते ती म्हणजे ऊर्जा. ऊर्जेच्या विविध प्रकारांसह त्यांनी इलेक्ट्रिसिटी, पॉवर व एनर्जी यांतील फरक उलगडून दाखवला.




पृथ्वीवरील कोळसा, खनिज तेल व इतर नैसर्गिक संसाधनांचे साठे मर्यादित आहेत. येणारी काही वर्षेच ती पुरतील. तसेच औष्णिक वीजनिर्मितीमुळे होणारे प्रदूषण व तापमानवाढ याचे दुष्परिणाम उमगल्यानंतर सर्व देशांना ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व पटू लागले. भारतात 1991 मध्ये सर्वप्रथम उद्योगांसाठी ही संकल्पना आली. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही पंचमहाभूते हे अक्षय ऊर्जेचे स्त्रोत आहेत. यातून विजेची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे आता जलविद्युत, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या हरित ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. ऊर्जा संवर्धनासाठी वेगवेगळे कायदे करण्यात असले तरी त्यासाठी सर्वांनीच स्वयंस्फूर्तीने प्रयत्न करायला हवे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन केल्यास हे उद्याचे नागरिक ऊर्जा संवर्धनाबाबत सजग राहतील. तसेच विजेचा वापर आवश्यक तेवढाच करायला हवा. अनेक गावे व शहरात पथदिवे दिवसा सुरू राहतात. असा विजेचा अपव्यय हा कायद्यानुसार दंडनीय अपराध मानला गेला आहे. विजेबरोबरच इंधन बचतीवरही सर्वांनी भर द्यायला हवा, असेही डॉ.केळे म्हणाले.

यावेळी शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी, कार्यकारी अभियंता (प्रशासन) दीपक सोनोने यांनीही वीज बचतीबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत भाष्य केले. कार्यक्रमास प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी अधीक्षक अभियंता (संचालन) प्रेमसिंग राजपूत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) चंद्रकांत खाडे, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) स्वाती चव्हाण-गाडेकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, रमेश वाघचौरे, प्रणाली विश्लेषक अनिल जाधव, प्रकाश चांडगे, मनीषा निफाडकर, राजाराम पाटील, कनिष्ठ विधी अधिकारी सुनील पावडे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

नुकताच प्रसिद्ध झालेला आर्थिक असमानता अहवाल सांगतो की देशातील निम्म्या लोकांची वार्षिक कमाई फक्त ५०००० रु आहे. देशातील पन्नास टक्के लोकांकडे देशातील संपत्तीच्या फक्त १३% संपत्ती आहे. तर आश्चर्य म्हणजे फक्त एक टक्का लोकांच्या हातात देशातील २२%संपत्ती एकवटली आहे. हे आकडे पुरेसे बोलके आहेत.
इंटरनेट, मोबाईल मुळे जवळची माणसे दूर गेली आहेत. लांबची माणसे ' आभासी ' पद्धतीने जवळ आली आहेत. घरात असणाऱ्या चार माणसांची तोंड त्यामुळे चार दिशांना झाली आहेत. माणसामाणसातील अंतर वाढते आहे.
लोकांमध्ये सामाजिक अंतर पडलं आहे, आर्थिक अंतर पडलं आहे. जातीजातीत, मनामनात माणूस विभागला गेला आहे. समाजाची एकसंध असणारी वीण उसवत चालली आहे. ती जास्त उसवण्याआधी त्यासाठी काहीतरी करण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा सगळ्यांची आहे. अन्यथा पुढच्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत. असं म्हणतात की श्रीकृष्णाला मिळालेल्या शापामुळे त्याचे यदुकुळातील वंशज आपसातच लढून संपले. आपल्यावरही आपसात लढून असे संपण्याची वेळ तर येणार नाही ना अशी भीती आजच्या या वातावरणामुळे निर्माण झाली आहे. त्यासाठी मने सांधणे गरजेचे आहे. एकमेकांना समजून घेणे महत्वाचे आहे. या समाज व्यवस्थेतील प्रत्येकच घटक महत्वाचा आहे. हे त्याचे महत्व जेव्हा आम्ही समजून घेऊ, तेव्हाच या समाजाला एकसंध करण्याच्या दिशेने आपले पहिले पाऊल पडेल. नाहीतर आमच्यातील अंतर वाढतच जाईल. त्यासाठी हे अंतर जोडणारा मनामनांचा सेतू आम्हाला उभारावा लागेल. इंग्रजीत त्यासाठी एक छान वाक्प्रचार आहे ' ब्रीज द गॅप. '
अंतर कमी होण्यासाठी ' अंतरात ' डोकावून पाहावं लागेल. त्यासाठी हे मानवा ' अंतरातील ज्ञानदिवा मालवू नको रे... ' एवढेच सांगावेसे वाटते.



## आनंदी पहाट

## दयाशील होण्याचे कौशल्य

आधुनिक केसरी

दया ही एक नैसर्गिक मानवी गुणवत्ता आहे, जी आपल्या जीवनाशी आणि सामुदायिक कार्याशी अत्यंत संबंधित आहे. वेदना कमी करण्यासाठी, शांतता आणि न्यायाने एकमेकांशी संबंध ठेवण्याचा हा एक व्यावहारिक आणि प्रभावी मार्ग आहे. दयेचे जाणीवपूर्वक स्वागत आपल्याच आतून उद्भवते आणि दुःख दूर करणाऱ्या व्यावहारिक, उपयुक्त कृती म्हणून इतर लोकांपर्यंत पोहोचते. दया म्हणजे चूकातून बरोबर बनवणे आणि गुंतलेल्या प्रत्येकाच्या फायद्यासाठी समस्या सोडवणे. कोणत्याही परिस्थितीत, विशेषतः जेव्हा लोक जखमी होतात, तेव्हा आपण दयाळू परिणामाची शक्यता सुधारण्यासाठी साधने आणि कौशल्ये उपलब्ध करू शकतो. समजूतदारपणा, क्षमा आणि उत्तरदायित्वाद्वारे आपण कुठेही असलो, तरी दया मिळविण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी व्यावहारिक टिपांनी परिपूर्ण करणे आवश्यक असते. लढाई जिंकण्याच्या मार्गापेक्षा, दया हा तर्काचा आवाज आहे, जो सहभागी असलेल्या प्रत्येकासाठी बोलतो. दयेचा अनुनय न्याय्य आहे, कारण त्यात सर्व दृष्टीकोन समाविष्ट आहेत. कायदेशीर प्रोटोकॉल, वादविवाद प्रणाली, तुरुंग किंवा शारीरिक शिक्षा यांच्या पलीकडे, फौजदारी न्याय ह्यामध्ये दया हे अन्यायाचे उत्तर आहे. दया आम्हाला शिक्षेशिवाय समस्यांचे निराकरण करून न्याय्य उपाय शोधण्यात मदत करते. दयाळू कृती, जसे की पुनर्संचयित न्याय, सहसा आश्चर्यकारक असतात, सहसा बरे होतात आणि कधीकधी वरवर पाहता चमत्कारी देखील असतात. दयेची संकल्पना सांस्कृतिक पातळीवर स्वीकारली जाणे आवश्यक आहे. त्याबाबत स्वारस्य सतत वाढले पाहिजे आणि चित्रपट तसेच कथांशी संबंधित त्यांच्या शीर्षकांमध्ये लोकप्रियता वाढली पाहिजे. प्रवचनात हा शब्द वापरत असताना, सध्याच्या काळात दया म्हणजे काय याचे उत्तर शोधण्याचा आपण प्रयत्न करतो. कादंबरीकार, कार्यकर्ते आणि आध्यात्मिक मार्गदर्शक त्यांचे स्वतःचे स्पष्टीकरण व्यक्त करत असताना, येथे आपण कृतीत करुणा म्हणून दया आणण्यासाठी व्यावहारिक कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## एकरूप झाला | मौना संगे ||

सापडली वाट | आनंदाची आता ||
गावली रे माता | अनाथास ||१||
माऊलीची ओवी | वाटते अंगाई ||
आत्ममग्न होई | मौन निद्रा ||
ज्ञानाच्या मंदिरी | आत्म्याचे भजन ||
कर्माचे पुजन | पुण्य फळ ||३||
राम कृष्ण हरी | मंत्र आत्माराम ||
सांगे तुकाराम अभंगात ||४||
ज्ञानयोगी माझी | विश्वाची माऊली ||
कैवल्य सावली | शांतीरूप ||५||
सुख-दुःख आता | भेद न उरला ||
एकरूप झाला | मौना संगे ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

लेंकुरें उदंड जालीं ।तों ते लक्ष्मी निघोन गेली ।
बापडीं भिकेसी लागलीं ।कांहीं खाया मिळेना ॥१॥
लेंकुरें खेळती धाकुटीं ।येकें रांगती येकें पोटीं ।
ऐसी घरभरी जाली दाटी ।कन्या आणी पुत्रांची ॥२॥
देवसेंदिवसा खर्च वाढला ।यावा होता तो खुंटोन गेला ।
कन्या उपवरी जाल्या, त्यांला- ।उजवावया द्रव्य नाहीं ॥३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

श्रद्धा शम दम ऊपरम, समाधानता जान ।
और तितिक्षा साधना, यह सम्पति परमान ।।७७।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/७७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
श्रद्धा, शम, दम, अनासक्ती, समाधानता ( सद्गुरूदेवांच्या उपदेश, आदेशाचे ह्रदयात जतन ) आणि तितिक्षा या षट् संपत्ती अर्थात हे गुण अंगी असणे योगाभ्यासींसाठी आवश्यक आहे. याद्वारे साधना-मार्गात प्रगती होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५७वे


शांताश्रम स्वामींनी विचारले ।
मज प्रश्न हो पडले ।
जर उत्तर तुम्ही याचे दिले ।
निरसन होईल महाराज ।।१ ।।
श्री महाराज बोलले ।विचारा स्वामी,
प्रश्न जे पडले ।सांगा तुमच्या मनातले ।
देईन उत्तर त्यांचे ।। २ ।।
प्रश्न स्वामींनी विचारला ।
भारतातून लोक येती काशीला ।
करण्या गंगा स्नानाला। परी पावन,
का न होती हे ? ।। ३ ।।
महाराज म्हणती याला कारण,
खरी भावना नाही ।
उत्तर हे स्वामींना पटले नाही ।याची
भावना खरी नाही ?।
कसे म्हणता असे ? ।। ४ ।।
काही दिवसांनी श्री महाराजानी एक केले ।
शांताश्रम स्वामींना महारोग्याचे रूप दिले ।
घाटावर नेऊन बसविले ।
स्वतः उभे राहिले बाजूला ।। ५ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## कोणत्याही प्रसंगात नामाला सोडू नका

आधुनिक केसरी



आकाशाला भिऊन पळाले तरी कुठेही आकाश हे असणारच, त्याप्रमाणे कुठेही गेले तरी देह, मन, आणि त्याच्याबरोबर त्याचे भोगही आपल्याबरोबर येणारच. म्हणून आपल्या वाट्याला आलेले कर्माचे भोग समाधानाने भोगायला शिकावे. ‘ प्रयत्न केला असता तर बरे झाले असते ’ असे जोपर्यंत वाटते, तोपर्यंत प्रयत्न हा अवश्य करावा. यश किंवा अपयश देणारा परमात्माच, असे समजून प्रयत्न करावा. सर्व कर्तृत्व त्याच्याकडेच द्यावे. तुझी सेवा किती दिवस करू असे परमेश्वराला विचारणे म्हणजे सेवेत कमीपणा आलाच; तसेच, त्याच्या नामाबद्दलही मुदत कशी घालता येईल ? विषय किती दिवस भोगू, असे नाही आपण म्हणत ! मग नामाबद्दलच का असे विचारावे ? आज भगवंत एका टोकाला आणि आपण दुसऱ्या टोकाला आहोत. त्याच्या नामाने त्याला जवळ जवळ आणावा. आपल्याला जितका आपल्या देहाचा विसर पडेल तितका भगवंत आपल्या जवळ येईल. भगवंताच्या नामातच सत्संगती आहे. प्रपंचामध्ये कसलेही प्रसंग येऊ द्या, तुम्ही नामाला सोडू नका. मनाला रिकामे ठेवले की ते विषयाच्या मागे धावलेच समजा. म्हणून आपले मन नेहमी गुंतवून ठेवावे. उठणे, बसणे, जप करणे, वाचन करणे, गप्पागोष्टी करणे, चेष्टा-विनोद करणे, वगैरे सर्व क्रियांमध्ये भगवंताशी संबंध आणि संदर्भ ठेवावा; हेच अनुसंधान होय. भगवंताचे अनुसंधान हे आपले ध्येय; त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी आपण करू या. आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळी म्हणजे भगवंताचे नाम होय. म्हणून आपली वृत्ती सदैव नामामध्ये गुंतवून ठेवावी. नामाचे अनुसंधान टिकेल अशीच उपाधी बाळगावी. नाम नुसते घेतल्याने काम होईल; पण ते समजून घेतल्याने काम लवकर होईल. नाम मुखी आले की सत्कर्मे आपोआप होऊ लागतात. आपल्या प्रत्येक कर्माचा साक्षी राम आहे असे समजून वागावे, म्हणजे दुष्कर्म हातून घडणार नाही. आपण उगाचच सबबी सांगत असतो. काम असेल त्या वेळी कामाची सबब; पण काम नसेल त्यावेळी नामस्मरण न करता, उगाचच गप्पा, नाही तर निंदा-स्तुती, किंवा इतर खेळ खेळण्यात वेळ घालवतो. तसे करू नये. आपले मन उनाड आहे. त्याला एके ठिकाणी स्वस्थ राहाण्याची सवयच नाही. त्याला थोडी बळजबरी करून नाम घ्यायला लावले पाहिजे. नामामध्ये भगवंताची शक्ती असल्याने नाम घेणाऱ्याची देहबुद्धी क्रमाक्रमाने कमी होते आणि नाम स्थिरावते. नित्य नामस्मरण केल्यावाचून अंती ते येणार नाही. जागेपणी अभ्यास केला तर झोपेच्या वेळी स्मरण येईल, झोपेच्या वेळी स्मरण झाले तर रात्री स्वप्नात तेच होईल, आणि असा सदोदित ध्यास ठेवला तर मरणाच्या वेळीही तेच स्मरण राहील.

## संत चोखामेळा

आधुनिक केसरी

हे यादव काळातील नामदेवांच्या संतमेळ्यातील वारकरी संप्रदायातील कवी होते. चोखोबांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा किंवा मेहुणपुरी या गावी झाला. संत चोखामेळांचे कुटुंब हे जातीने महार होते. चोखोबांचा जन्म पंढरपूरला झाल्याचे संत महिपती सांगतात. चोखोबा मूळ वऱ्हाडातील आहेत असेही म्हटले जाते. त्यांची पत्नी सोयरा, बहीण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व प्रपंचाचे काबाडकष्ट उपसत असतानाच नित्यनेमाने व भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण व गुणसंकीर्तन करीत होते.



धाडसी चुटकीची रोमांचक समुद्री सफर - चुटकीचं जग पान 6

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २१ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# कायदा सुव्यवस्थेबाबत महाराष्ट्र बिहारच्या मागे

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र बिहारच्या देखील मागे पडला आहे. उपराजधानी नागपुरातही तीच परिस्थिती आहे. त्यामूळे फडतूस नाही, काडतूस आहे म्हणणाऱ्या गृहमंत्र्यांचाही दरारा नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज सरकारवर केली. आज हिवाळी अधिवेशनादरम्यान अंतिम आठवडा प्रस्तावावर पाटील यांनी त्यांचे मत व्यक्त केले. जयंत पाटील पुढे म्हणाले की, आर्थिक नियोजनाच्या बाबतीत सरकार अतिशय बेशिस्त असल्याचे दिसत आहे. नोटा छापण्याचा अधिकार घेऊन राज्य काम करत आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. सरकारच्या तिजोरीत असलेल्या पैशापेक्षा १ लाख १६ हजार कोटी रुपयांचा निधी पुरवणी मागणीच्या रुपात आपल्या समोर आहे. नुकतच शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीची रक्कम ४४ हजार कोटी आहे. मार्चपर्यंत राज्य सरकारला १ लाख ६० हजार कोटींची अधिकची रक्कम आवश्यक आहे. इतके उत्पन्न वाढण्याची शक्यता नाही. त्यामुळे मंजूर केलेली कामे पूर्ण होण्याची शक्यता नाही. सभागृहातल्या सदस्यांची निव्वळ फसवणूक सुरू आहे. या सरकारने १ लाख कोटींच्या अधिकच्या हमी घेतल्या आहेत. एमएमआरडीए सारख्या संस्था आर्थिकदृष्ट्या पूर्ण मोकळ्या केल्या आहेत अशी टीका त्यांनी केली.



अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत. नार पारचा प्रकल्प, वैनगंगा ते नळगांगा जोडण्याचा प्रकल्प यांना चालना दिलेली नाही. त्यामुळे विदर्भातील पाण्याचा प्रश्न सुटण्याची शक्यता कमीच आहे. शालेय शिक्षणाची दुरवस्था आहे. राज्यातील वीस हजार शाळा बंद करण्याचा घाट सरकारने घातला आहे असा गंभीर आरोप त्यांनी सरकारवर केला.

कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र बिहारच्या देखील मागे पडला आहे का अशी शंका वाटते आहे. सत्तेच्या जवळ असलेल्या लोकांच्या विरोधात कुठलीही तक्रार करता येत नाही. प्रार्थना स्थळांमध्ये देखील हाणामारी होऊ लागल्या आहेत. जाती, धर्मात दंगली राज्य दंगलीत पहिल्या नंबरवर आहे. आम्हीही हिंदू आहोत. आम्हालाही आमच्या धर्माचा अभिमान आहे, पण त्यासाठी इतर धर्मियांना डीवचण्याची आपली परंपरा नाही असे सुनावताना पाटील यांनी केंद्राने केलेल्या उत्कृष्ट पोलीस स्टेशनच्या यादीत महाराष्ट्राच्या एकाही पोलीस स्टेशनचे नाव नाही. एकेकाळी मुंबई पोलीसच तुलना स्कॉटलंड या देशाच्या पोलिसांशी व्हायची अशी माहिती सभागृहाला दिली. महाराष्ट्रातील ५० लाख केसेस न्यायालयात पेंडिंग आहेत. रेट ऑफ कन्वीक्शन कमी होत आहे. गृहमंत्र्यांनी भाषणात म्हंटले होते, " मी फडतूस नाही, काडतूस आहे". त्यांचा हाच दरारा उप राजधानी नागपूर येथे दिसायला हवा. जिल्ह्याजिल्ह्यात दरोडे, खून यांचे प्रमाण वाढत आहे. मागच्या वर्षात २९०४ बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. यात राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. सरकार महिलांना सुरक्षितता देण्यासाठी पूर्णपणे असफल ठरलेले आहे. पोलीस खात्यात इतकी पदे रिक्त असताना पोलीस भरती न करता कॉन्ट्रॅक्टवर भरती करण्याचा सरकारचा डाव आहे असाही आरोप त्यांनी यावेळी केला. अमली पदार्थांचे प्रमाण राज्यात वाढले आहे. "उडता महाराष्ट्र" परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. महाराष्ट्रात ड्रग माफियांना राजाश्रय देण्याची प्रथा सुरू झाली आहे. गुन्हेगारांना संरक्षण देण्याचे काम सुरू आहे. कोयता गँगचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिस प्रशासन अपयशी ठरले आहे. सायबर क्राईम प्रचंड वाढला आहे. १३००० मुली बेपत्ता झाल्याची नोंद आहे. राज्य हतबल झाले आहे. ही राम भूमी आहे. श्री रामाचा आदर आहे तर मग राज्यातील तमाम सीता माईंचे संरक्षण करण्याची जबाबदारी घ्यावी असे आवाहन त्यांनी सत्ताधाऱ्यांना केले. महाराष्ट्राची सर्व बाजून अधोगती सुरू आहे. उद्योग बाहेर जात आहेत. त्यामुळे बेकरी निर्माण झाली आहे. आणि बेकरीचे मूळ गुन्हेगारीत आहे. भ्रष्टाचारची लीब्रल व्यवस्था राज्यात निर्माण झाली आहे. हे गंभीर आहे. लोकप्रतिनिधींना सस्पेंड करायचं आणि राज्य करायचं ही प्रथा देशात सुरू झाली आहे. निधी देतानाही विषमता आहे. या सर्व मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांनी आत्मचिंतन करावे असेही त्यांनी सांगितले.

# देवहिवऱ्यात कुस्ती स्पर्धेला चांगला प्रतिसाद; जालना जिल्ह्यांसह बाहेरच्या जिल्ह्यातील पैलवानांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** देवहिवरा ता.घनसावंगी येथील खंडोबा यात्रेनिम्मीत आयोजीत कुस्ती स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला या स्पर्धेत जालना जिल्ह्याबरोबर सभोवतालच्या औरंगाबाद, परभणी, बीड या जिल्ह्यातील कुस्ती पैलवानांनी या स्पर्धेत हजेरी लावून मोठ्या प्रमाणांवर बक्षिस प्राप्त केली आहे. देवहिवरा ता. घनसावंगी येथील खंडोबा हे देवस्थान सर्व गावकऱ्यांचे श्रद्धास्थान असून अनेक वर्षापासून येथे कुस्ती स्पर्धा ठेवण्यात येते या साठी बक्षिसाची रक्कम, व इतर खर्च गावकऱ्यांच्या वर्गणीतून करण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांच्यावतीने कुस्तीची आवड कायम ठेवण्यासाठी या स्पर्धेस हवी असणारी वर्गणीची रक्कम मोठ्या उत्साहाने देण्यात आली. कुस्ती खेळण्यापूर्वी पैलवानाला मैदानात फिरवले जाते त्यांवर रक्कम लावून त्यांच्याशी कुस्ती खेळण्यासाठी ललकारी दिली जाते त्या पैलवानांशी दुसरा पैलवान आव्हान देतो त्यावेळी कुस्ती लावण्यात येते याच काळात त्याला




ढपड्याच्या आवाजाने त्यांला प्रोत्साहन दिले जाते जो प्रतिस्पर्धीला पाडतो त्यांच्यावर बक्षिसाचा वर्षाव करण्यात येतो अशा प्रकारे अनेक पैलवानांशी कुस्ती लावून कुस्ती जिकल्या कुस्तीसाठी यंदा परिसरातील बाचेगाव, वडीराङ्कसगाव, भांबेरी, भार्डी, मादळा, गेवराई , गोंदी, राणीउचेंगाव, लोणारभायगाव, पानेवाडी यासह बीड, पैठण, जालना, औरंगाबाद येथील पैलवानांनी हजेरी लावून कुस्ती स्पर्धेत सहभाग नोंदवला यात युवकांचा जास्त भरणा होता. या स्पर्धेसाठी प्रांरभी पाचशे रूपयापासून सात हजार रूपयापर्यत कुस्ती लावण्यात आली यात जवळपास एक लाख रूपयांचे पारीतोषके वितरीत करण्यात आली. या स्पर्धेच्या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य काशीनाथ मते, तर प्रमुख पाहुणे म्हणून घनसावंगी तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सुभाष बिडे, पत्रकार बाळासाहेब ढेरे, पांडूरंग साळवे, रामदास घोगरे, दामोधर शेंडगे, विष्णू बिडवे यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पंढरीनाथ मते, परमेश्वर मते, नारायण शेंडगे, किसनराव शिंदे, बाळासाहेब गाढे, सुदाम जवळकर, गणेश जवळकर, संतोष खाडे, बद्री खाडे, नवनाथ लोणे, सतीश उगले, कैलास वाघमारे, सिध्देश्वर शिंदे, बंडू शिंदे, हरीश्चंद्र मते, बाबासाहेब जवळकर, प्रवीण चव्हाण, दत्तात्रय मते, अनिरूध्द मते, कल्याणराव मते, सुशील बरडे, शरद जवळकर, लक्ष्मण चव्हाण, गणेश शिंदे, सोपानराव मते, विठ्ठल काळे, प्रकाश जवळकर, कृष्णा उगले, नामदेव मते, श्रीधर मते, विजयकुमार मते, त्रिंबक मते, विलास शेडगे, गिताराम मते, जग्ननाथ बरडे, गोवर्धन मते, रविंद्र शेंडगे, दिलीप गाढे, नामदेव मते, विकास बरडे, विष्णू काळे, हनुमंत बरडे, गजानन ठुले, दिलीप तौर, शिवाजी मदनुरे, शहादेव रक्ताटे, नारायण मते, गयादास मते, जगन्नाथ जवळकर, मनोहर जवळकर, सचिन शेळके, अचित गोरे, सोपान बेलनुरे , जितेंद्र मते यांच्यासह गावकऱ्यांकडून या कुस्ती यांच्यासह गावकऱ्यांच्या पुढाकर घेण्यात आला.

# पंचवीस हजार शेतकरी 'किसान सन्मान'पासून वंचित!

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभापासून जिल्ह्यातील तब्बल २४ हजार ४१६ लाभार्थी शेतकरी वंचित आहे. या शेतकऱ्यांनी आवश्यक पूर्तता न केल्याने त्यांच्या वर ही वेळ



आल्याचे सांगितले जात आहे. किसान सन्मान निधी योजने अंतर्गत केंद्र आणि शासनाकडून पात्र शेतकरी कुटुंबांना वर्षाकाठी प्रत्येकी सहा हजार रुपये दिले जातात. यामुळे अडचणीत असलेल्या लाखो शेतकऱ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरली आहे. मात्र, यासाठी लाभार्थ्यांनी 'ई-केवायसी' आणि आधार सीडींग' करून घेणे बंधनकारक आहे. नेमके तेच न केल्याने २४ हजारांवर शेतकरी वंचित आहेत. जिल्ह्यातील १० हजार ६१९ शेतकऱ्यांनी 'केवायसी' तर १३ हजार ७९७ शेतकऱ्यांनी 'आधार लिंकिंग' केलेच नाही. योजनेचा १६ वा हप्ता जानेवारी, २०२४ च्या शेवटी वितरीत करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या मोहिमेतर्गत तरी ही पूर्तता करून घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांना यासाठी तालुका कृषि कार्यालय, कृषी सहाय्यक, गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा लागणार आहे.

# शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करा : रिपाइं

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करा अशी मागणी करणारे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खंडाळा तालुक्याच्या वतीने लोणंद पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने असे म्हटलेले आहे की महाराष्ट्र बरोबर सातारा जिल्ह्यात खंडाळा तालुक्यात पाऊस कमी झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे.त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झालेला असून बळीराजा चिंताग्रस्त आहे.शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही.

शेतकऱ्यांना आर्थिक गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. खंडाळा तालुक्यातील शेतकरी शेती बरोबर जोडधंदा म्हणून पशुपालनाचा व्यवसाय करतात. अशातच फलटण तालुक्यातील कुसुर या गावातील संदीप लालासो नरुटे व आकाश नामदेव जमदाडे यांनी खेड बुद्रुक येथील शेतकऱ्यांना गाई गुरांच्या गोठ्यांची प्रकरणे करून देतो. तसेच तुम्हाला बाकीच्यांपेक्षा एक दोन रुपये जास्त दुधाला दर देतो, तुम्हाला फुकट गुरे तपासणीसाठी डॉक्टर देतो.अशी बरीच आमिषे दिली. खेड बुद्रुक येथील शेतकऱ्यांना दूध चालू करायला लावले. आकाश नामदेव जमदाडे हा टेम्पो घेऊन दूध घेण्यासाठी येत होता. एक महिना शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्यानंतर दुधाचे पगार देण्यासाठी टाळाटाळ केली.तसेच शेतकऱ्यांनी विचारले की तुम्ही आमचा दुधाचा पगार का देत नाही. याच्या अगोदर संदीप नरुटे हे दुधाचा पगार करत होते. त्यांनाही शेतकऱ्यांनी फोन केला असता ते सुद्धा टाळाटाळ करीत राजकीय पुढाऱ्यांची




नांव सांगुन शेतकऱ्यांना दबाव टाकत. दुधाचा पगार हा दर पंधरा दिवसांनी एकदा होतो दिड दोन महिने उलटले तरी ते शेतकऱ्यांना पगार देत नाही. तसेच दुधाचा पगार मागितला तर शिवीगाळ दमदाटी करून धमक्या देत आहेत, असे शेतकऱ्यांचे म्हणणे असून शेतकऱ्यांनी रिपब्लिकन पक्षाचे खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे पाटील यांना लेखी तक्रारी अर्ज केल्यानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने लोणंद पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करा.अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आली. शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.तसेच काही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल. असे खंडाळा तालुकाध्यक्ष पवन धायगुडे यांनी म्हटलेले आहे. निवेदन देताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी तसेच फसवणूक झालेले शेतकरी उपस्थित होते.

# खरगेंची नाराजी

आधुनिक केसरी

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बुधवारी राज्यसभेतील कामकाजावरून नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "प्रत्येक विषयाला जातीच्या मुद्द्यावर आणण्याची गरज नाही. मला आज राज्यसभेत बोलू दिले नाही. मी दलित असल्यामुळे मला बोलू दिले नाही, असे मी म्हणू का?". उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती जगदीप धनकड यांनी त्यांची नक्कल केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. तसेच मी जाट समाजातील असून संघर्ष करत या पदावर पोहोचलो आहे, हा माझ्या जातीचाही अवमान असल्याचे ते म्हणाले होते. खरगे यांनी सभापतींच्या जातीबद्दलच्या वक्तव्याचा धागा पकडून सदर टीका केली. विशेष म्हणजे संसदीय कार्य मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज राज्यसभेत बोलत असताना नक्कल प्रकरणाचा उल्लेख करून विरोधकांवर टीका केली. तसेच सभापतीच्या सन्मानार्थ सर्व सत्ताधारी पक्षातील आमदार उभे राहून कामकाजात सहभागी होतील, अशी घोषणा करताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते सभापतींपर्यंत सर्वांच्या जातीचा उल्लेख केला होता. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी गरिब घरातून येतात, ते ओबीसी समाजातून येतात म्हणून त्यांचा अवमान केला गेला. त्यानंतर आदिवासी समाजातील एक महिला राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांचाही अपमान करण्यात आला. आता एका शेतकरी कुटुंबातून उपराष्ट्रपती झालेल्या माननीय सभापतींचा संसदेत अवमान करण्यात आला. पहिल्यांदाच जाट समाजाचा एक नेता उपराष्ट्रपतीपदावर पोहोचला. या पदावरील व्यक्तीचा अपमान करण्यात आला. त्यामुळे आम्ही उपराष्ट्रपताता अवमान आम्ही सहन करणार नाही. यासाठी आम्ही सर्व सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात जागेवर उभे राहूनच काम करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून आम्ही आपला सन्मान आणि विरोधकांचा निषेध करत आहोत. संसदेच्या बाहेर माध्यमांशी बोलताना खरगे म्हणाले की, सभापतींनी इतर सदस्यांना बोलताना संरक्षण देण्याची गरज असते. मात्र ते स्वतःच अशाप्रकारचे वक्तव्ये करत आहेत. मला नेहमीच राज्यसभेत बोलण्याची परवानगी नाकारली जाती. त्यामुळे मी दलित असल्यामुळेच परवानगी नाकारली जाते, असे म्हणू का? सभापतींनी तरी जातीच्या नावावर भडकाऊ विधान करणे टाळले पाहीजे. काँग्रेसचे लोकसभेतील सभागृह नेता अंधीर रंजन चौधरी यांनीही याबाबत खेद व्यक्त केला. ते म्हणाले, संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने स्वतःच्या जातीचा उल्लेख करणे योग्य नाही. संसदेत झालेल्या घुसखोरी प्रकरणावरून हात झटकण्यासाठी सरकार इतर ठिकाणी लक्ष वळविण्याचा प्रयत्न करत आहे. आता प्रत्येकाने काय स्वतःच्या जातीचा शिक्का लावून फिरावे का? असाही संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# दाऊदवरील विषप्रयोगाचे वृत्त ही पाकिस्तानची खेळी


आधुनिक केसरी

**भारताचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू व भारतासाठी मोस्ट वाँटेड दहशतवादी दाऊद इब्राहिम पुन्हा एकदा चर्चेत आला आहे...पाकिस्तानने आश्रय दिलेल्या दाऊदवर विष प्रयोग करुन त्याची हत्या केल्याच्या बातम्या समोर येत आहे.. यात किती तथ्य आहे..हा एक प्रश्नच आहे. या आधी देखील दाऊद मेल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या.पण त्या खोट्या ठरल्या. पाकिस्तानने दाऊद ला आश्रय दिले.**

त्याचा ठाव ठिकानाव पत्ता पाकिस्तानच असताना पाकिस्तानने नेहीच नेहमीचं भारताचे आरोप फेटाळून लावले.भारताने कित्येकदा पाकिस्तानसह जागतिक मंचावर दाऊदची मागणी केली पण प्रत्येक वेळी पाकने खोटे बोलून भारताची मागणी दुर्लक्षित केली.. अमेरिकेसह संयुक्त राष्ट्र संघाने दाऊद वर कोट्यावधी रूपये लावलेले आहेत. मात्र पाकिस्तानने नेहमीच भारतासह जागतीक समुदायाची दिशाभूल केलेली आहे.पाकिस्तानवर सतत दबाव होता. पण या सगळ्याची पर्वा न करता पाकिस्तानने भारताचा सर्वात मोठा शत्रू आणि डी कंपनीच्या दाऊद इब्राहिमला पाकिस्तानात आश्रय दिला. भारतात दहशत पसरवण्याची संपूर्ण यंत्रणा त्याच्या हाती सोपवली.

आता पुन्हा एकदा पाकिस्तानात दाऊद इब्राहिमला विष देऊन मारण्यात आल्याची चर्चा रंगत आहे.मात्र पाकिस्तान भारतासह जगाची दिशाभूल करण्यासाठी पाकिस्तानने ही खेळी खेळली असल्याचे अभ्यासकांना वाटते. दाउदच्या माध्यमातून भारतात दहशतवादी हल्ले करता येणे सहज शक्य असल्याने पाकिस्तानने नेहमीच दाऊद बद्दल खोटी माहिती देत दिशाभूल केलेली आहे दाऊद पाकिस्तानसाठी भारत विरोधासाठी आवश्यक आहे.त्याला विष देवून मारण्याची ही पाकची खेळी आहे. दौउदला. आश्रय दिल्याचा पाकिस्तानचा इतिहास राहिलेला आहे.

१९९३ मध्ये दाऊद आयएसआय प्रमुख जावेद नसीरचा जवळचा सहकारी बनला होता.पाकिस्तानने नेहमीच अशा लोकांना पाठिंबा दिला आहे जे भारताला अस्थिर करू शकतात. ९० च्या दशकात दाऊद इब्राहिम हा पाकिस्तानचा एक मोठा मोहरा बनला, ज्याने पाकिस्तानच्या चिथावणीवर देशाच्या विविध भागात ड्रग्ज, शस्त्रे आणि दहशतीचे जाळे निर्माण केले.आय एस आय प्रमुख जनरल जावेद नासिर यांनी १९९३ मध्ये दाऊद इब्राहिमला दिलेल्या पाठिंब्यामुळे त्याचे अवैध साम्राज्य निर्माण करण्यात मदत झाली. १९९३ चे मुंबई बॉम्बस्फोट तत्कालीन आयएसआय प्रमुख जनरल जावेद नासीर यांच्या सूचनेवरून घडवून आणले होते. पाकिस्तानने दाऊदवर पैज लावण्याचे हे मुख्य कारण बनले. पाकिस्तान दाऊदला अवैध ड्रग्जमध्ये मदत करत होता. पाकिस्तानने दाऊदवर सट्टा लावला कारण तो भारताला पोकळ करण्यासाठी अवैध अमली पदार्थांच्या तस्करीचा सर्वात मोठा चॅनेल होता. दाऊद इब्राहिमचा पैसा ज्या प्रकारे मुंबईच्या बंदरांमध्ये वापरला गेला आणि त्याने अवैध ड्रग्सच्या व्यापाराला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. पाकच्या आश्रयामुळे दाऊद इब्राहिमने मुंबईच्या विविध बंदरांसह देशाच्या विविध भागात इतके मोठे नेटवर्क तयार केले की, अमली पदार्थांच्या तस्करीला थेट पाकिस्तानातून प्रोत्साहन मिळू लागले. ९० च्या दशकात मुंबईच्या रस्त्यांवर विकल्या जाणाऱ्या प्रत्येक ड्रग्जच्या मागे दाऊद होता आणि दाऊदच्या मागे पाकिस्तानचा हात होता. मुंबईत दाऊदच्या वाढत्या प्रभावामुळे पाकिस्तानला दाऊदला भारतात आपल्या योजना यशस्वी करण्यासाठी मैदानात उतरवणे आवश्यक वाटले. पाकिस्तानने दाऊदला अशा प्रकारे पाठिंबा दिला की सुरुवातीच्या टप्प्यात त्याने दाऊदला दुबईत मोठा आश्रय देण्यास सुरुवात केली. १९९३च्या मुंबई हल्ल्यानंतर दाऊदला पळून जाण्यात आणि नंतर त्याला आश्रय देण्यासाठी पाकिस्तानने सर्वात मोठी मदत केली. दाऊदने दुबईत राहून काळ्या पैशाचा तसेच मनी लॉन्ड्रिंगचा मोठा व्यवसाय सुरू केला. पाकिस्तानने यात नेहमीच मदत केली नाही तर काळ्या पैशाला चालना देण्यासाठी सर्व संसाधने उपलब्ध करून दिली, ज्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसेल. दाऊद इब्राहिम पाकिस्तानला त्याच्या योजना पुढे नेण्यासाठी मदत करत राहिला. त्यामुळेच दाऊदची पाकिस्तानशी जवळीक वाढली. पाकिस्तानने त्याला आधी दुबईला हलवले आणि नंतर कराचीत आश्रय दिला. दाऊदला भारतात ठेवायचे की दुबईमार्गे पाकिस्तानात आणायचे, हीच पाकिस्तानची कोंडी होती. २००१मध्ये पाकिस्तानने मुंबईतील अंडरवर्ल्डचे मुख्यालय दुबईहून




कराचीला हलवण्याचा निर्णय घेतला. २००१ मध्ये, तत्कालीन आयएसआय प्रमुख मोहम्मद अहमद यांनी दाऊदला दुबईहून पाकिस्तानातील कराची येथे राहण्यासाठी आणि तेथून त्याची टोळी चालवण्याची व्यवस्था करण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर पाकिस्तानने दाऊदला आपल्या देशात राहण्यासाठी जागाच दिली नाही तर त्याच्याकडे सर्व यंत्रणा सुपूर्द केल्या, ज्याद्वारे भारताला अस्थिर करण्याचा कट रचला जाऊ शकतो. कराचीत राहत असताना दाऊदने पुन्हा एकदा मुंबईला पैसे उकळण्यासाठी कंत्राटे देणे, मोठमोठ्या मालमत्ता ताब्यात घेणे तसेच अवैध ड्रग्सचा व्यापार आणि खून करणे सुरू केले. या काळात त्याने मुंबईत अनेक प्रभावशाली लोकांची हत्या केली. दाऊदच्या माध्यमातून पाकिस्तानने खंडणीचे संपूर्ण जाळे तयार केले. बेकायदेशीर अंमली पदार्थांच्या व्यापारापासून ते मनी लॉन्ड्रिंगपर्यंत आणि बॉलीवूडवर नाका घट्ट करण्यासाठी पाकिस्तानातील दाऊदच्या नेटवर्कद्वारेच भारताला अवैध शस्त्रसाठा मोठ्या प्रमाणावर विकण्याचा मार्ग तयार करण्यात आला होता. सुरुवातीच्या टप्प्यात डी कंपनीने बेकायदेशीर शस्त्रास्त्रांसह सोन्याच्या तस्करीसाठी आपले नेटवर्क मोठ्या प्रमाणावर वापरले. या काळात दाऊद इब्राहिमने देशातील सर्वात मोठा आर्थिक उद्योग, चित्रपट उद्योग एक प्रकारे बेकायदेशीरपणे काबीज केला होता. पाकिस्तान आयएसआयच्या इशाऱ्यावर दाऊद इब्राहिमने सतत आपले नेटवर्क मजबूत करून देश अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या काळात भारतीय सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणांनी त्याचे नेटवर्क कमकुवत करत राहिले. पण दाऊदची पाकिस्तानकडून ड्रग्ज, शस्त्रास्त्रे आणि बॉलीवूडमधील जोरदार हस्तक्षेप यासारख्या बाबींमध्ये बारकाईने तपासणी सुरू झाली.

पाकिस्तानला दाऊदच्या टोळीत फूट पडू द्यायची नव्हती, पण परिस्थिती चिघळत राहिली. पण हळूहळू दाऊद इब्राहिमच्या टोळीत फूट पडली. पाकिस्तान आणि आयएसआयला दाऊद इब्राहिमची टोळी फुटून त्याला कमकुवत करायचे नव्हते. पण हे होऊ शकले नाही. पाकिस्तानने सर्वतोपरी प्रयत्न करूनही दाऊद इब्राहिमच्या नेटवर्कची आणि त्याच्या डी कंपनीची मुळे सतत कमकुवत होत गेली. पाकिस्तानचा याच्याशी काहीही संबंध नसला तरी तो म्हणतो. दाऊद इब्राहिमला आश्रय देण्याऐवजी भारताला अस्थिर करण्याचा पाकिस्तान नेहमीच प्रयत्न करत आहे. याच संदर्भात पाकिस्तानने नेपाळमध्येही दाऊदचे नेटवर्क सक्रिय करण्यास सुरुवात केले आहे. नेपाळमधून अवैध ड्रग्ज आणि अवैध शस्त्रास्त्रांची भारतात तस्करी स्थानिक माफियांच्या माध्यमातून सक्रिय होऊ लागली. तो ज्यामुळे पाकिस्तानने दाऊद इब्राहिमवर मोठा सट्टा लावला आणि त्याला आपल्या देशात आश्रय दिला. पाकिस्तानने दाऊदचा वापर भारत विरोधात करुन भारताला अस्थिर करण्याचा, भारतात दहशतवादी हल्ले व बॉम्ब स्पोट घडवून आणण्यात पाकिस्तानचा नेहमीच यशस्वी झाला.त्यामुळें दाऊदवर पाकिस्तान मध्ये विष प्रयोग करेल यात फारसे तथ्य नाही ही पाकिस्तानची बनवेगिरी आहे.दाऊदने विषप्रयोग केल्याचा दावा केला जात आहे, मात्र याला अद्याप स्वतंत्रपणे दुजोरा मिळालेला नाही. दरम्यान, भारताला खूश करण्यासाठी आयएसआय दाऊदवर कारवाई करू शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# जिंकण्यासाठी बुद्धीचं बळ सर्वोत्कृष्ट ठरतं

आधुनिक केसरी

**आपल्या बुद्धी चा विकास हा आपल्यावरच अवलंबून असतो.ज्या पद्धतीने आपण बुद्धीचा विकास होण्यासाठी प्रयत्न करू त्या पद्धतीने विकास घडत असतो.आपली बुद्धी हे आपलं बळ बलस्थान व्हावं वाटत असेल तर बुद्धी तल्लख प्रगल्भ होण्यासाठी आपण बुद्धी विकासावर लक्ष्य केंद्रित केल पाहिजे.जीवनात बुद्धीचं बळ हे कधीच व्यर्थ जात नाही.जीवनाशी निगडित अथवा सृष्टी वरील कोणत्याही क्षेत्रातील यशाल गवसणी घालण्यासाठी निःसंशय बुद्धी बळ उपयोगी लाभदायक ठरत. शक्ती बळ लढायला शिकवत तर बुद्धी हि जिंकायला शिकवते म्हणून किती हि कठिण आणि बिकट परिस्थिती प्रसंगात विजय मिळविण्यासाठी बुद्धीच बळ वापरलं तर ते व्यर्थ जात नाही.**

प्रचंड अनियंत्रित बळ शक्ती हि युद्ध घडवू शकते. युद्धात पराक्रमाची पराकाष्ठा करू शकते वेळ प्रसंगी अनर्थ देखिल घडवू शकते.पण नुसत्या बळावर विजय यश मिळेलच असं नाही. मात्र बुद्धी बळ वापरलं तर मग मात्र कितीही कठिण प्रसंगात हमखास विजय मिळणारच.बळ आणि बुद्धी यांचा संगम अपवादात्मक परिस्थितीत एकत्र आढळून येतो हा संगम आढळून आला तर मग मात्र अशक्य हि शक्य होत.बहुतांश वेळा आपला विश्वास हा आपल्या बळावर असतो.कारण बळ हे लढायला शिकवते हे वास्तव आहे.पण अनेक वेळा अनेक ठिकाणी शक्ति पेक्षा युक्ति बुद्धी हि उपयोगी पडते.पराभवाला अपयशाला यशात परिवर्तित करण्याचं सामर्थ्य ताकदी मध्ये नाही तर युक्ति मध्ये असतं.बुद्धी हि जिंकायच कसं याचा वस्तुपाठ रचत असते. आपण इतिहासाचा मागोवा घेतला तर याची चुणूक आपल्याला अनेक प्रसंगी पाह्यला मिळते.अनेक धार्मिक पौराणिक ग्रंथात सुद्धा आपण लक्ष पुर्वक निरीक्षण केले.तर शरते शेवटी बुद्धी हि सरस प्रबळ ठरते. याचा अर्थ असा होत नाही कि आपण बलवान नसलं पाहिजे आणि फक्त बुद्धीवान असलं पाहिजे अस मुळीच नाही.आपण बलवान असलच पाहिजे.पण आपल्या बळावर बुद्धीच नियंत्रण असलं पाहिजे. आपला विश्वास हा बळा पेक्षा जास्त बुद्धी वर असला पाहिजे. नुसतं बळ हे लढ्याला शिकवत असल्याने अनेक ठिकाणी बळाचा वापर झाला.पण बुद्धी हि विजयाची शिल्पकार असल्याने नुसत्या बळाला बुद्धी ने परास्त करून धुळ चारली हा ईतिहास आहे. म्हणून जीवनात बळाच्या भरोशावर जास्त बिसंबुन न राहता बुद्धी बळावर वर जास्त विश्वास ठेवला पाहिजे.कारण बुद्धी हि विजयाची शिल्पकार असते.सृष्टी वरील कोणत्याही विषयात कोणत्याही क्षेत्रात बळ शक्ति ताकद हि आवश्यक बाब आहे.कारण बळ लढायला शिकवते.त्यापेक्षाही महत्वाची बाब म्हणजे बुद्धी हि आहे कारण बुद्धी जिंकायला शिकवते.आपण आपल्या जीवनातील प्रत्येक क्षणाच्या युद्धात कोणतं बळ वापरायचं हे आपल्यावर अवलंबून असतं.पण जो बळा बरोबर बुद्धी वापरतो तो विजयला सलामी देतो किंवा जो बळा ऐवजी बुद्धी वापरतो तो सुद्धा विजयाला गवसणी घातल्याशिवाय रहात नाही. म्हणून आपल्या जीवनात बळापेक्षा बुद्धी हि सरस किंवा उत्तम फलदायी ठरते. जीवनातील एखादया प्रसंगात किंवा अनेक वेगवेगळ्या प्रसंगांत आपल्या बाजूने कोण आहे ? विरोधात कोण आहे? किंवा आपल्या बाजूने आपल्या जवळ बळ किती आहे. आपण किती बलवान शक्तिशाली आहेत किंवा किती बळ विरहित आहेत याला फार महत्त्व नक्कीच नाही. या सगळ्यात आपल्या कडे बुद्धी बळ किती आहे यावर सगळं गणित बदलत असतं.बुद्धी बळ हे सगळ्या प्रकारच्या बळावर वरचढ ठरते. भारी पडते श्रेष्ठ ठरते. म्हणून कोणताही विषय असो वा समस्या, अडचण संकटं असो या मध्ये आपण आपल्या बळावर ताकदीने, शक्तिने समोरे गेल्यानंतर विजय मिळेल कि नाही याची खात्री कोणीही देवु शकणार नाही. या उलट बुद्धी बळावर समोर गेल्यानंतर विजय यश हे निश्चित मिळणार या मध्ये यत्किंचितही किंतु परंतु नाही. यश अपयश जिंकण हारण या मध्ये योग्य रणनिती खुप महत्वपूर्ण ठरते.ज्याची रणनिती योग्य तो जिंकतो यशस्वी होतो. पण रणनिती हि बळा पेक्षा बुध्दी वर जास्त अवलंबून असते. म्हणून युद्धात असो किंवा जीवनातील छोट्या छोट्या विषयात यश अपयशात आपल्याला बळापेक्षा बुद्धी हि नक्कीच उत्तम पद्धतीने कामी येते. म्हणून आपल्या कडे असणार बळ ताकद शक्ती आपल्याला लढायला शिकवते या मध्ये दुमत नाही.पण आपल्याकडे असणारी बुद्धी हि जिंकायला शिकवते. मग लढ्याला शिकवणे उत्तम कि जिंकायला शिकवणे उत्तम तर अंतिमतः जिंकाण्याला महत्व असल्याने हेच कधीही उत्तम ठरत. आणि ज्याच्या कडे बळ आणि बुद्धी दोन्ही आहे. तो महा भाग्यवान आहे.जीवनात शक्ति हि आवश्यक बाब आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पतंजलीच्या हडको येथील योग शिबिराची सांगता

## राज्य प्रभारी दत्तात्रय काळे, सहराज्य प्रभारी संजीवनी माने यांच्या उपस्थितीत योग शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** श्री बालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर सोसायटी हडको, नांदेड येथे चालत असलेल्या 11 दिवसीय निशुल्क योग शिबिराचे आज समापन करण्यात आले. 10 डिसेंबर ते 20 डिसेंबर 2023 असे 11 दिवस सकाळी 5.30 ते 7.00 दरम्यान हडको व सिडको येथील साधकांनी या शिबिराचा लाभ घेतला. आदरणीय श्री अनिल अमृतवार यांनी अकरा दिवस या शिबिराला मार्गदर्शन केले. आसन, प्राणायाम, सूक्ष्म व्यायाम, योगिक जॉगिंग, सूर्यनमस्कार, दंड, बैठका, ध्यान आदिचा सराव करून घेण्यात आला तसेच आहार, दिनचर्या, विरुद्ध आहारा बद्दल माहिती सांगितली. शिबिरा दरम्यान सर्व साधकांना रोज आवळा, अलवेरा, लिंबू,गुळवेल, गाजर, बीट यांचा ज्यूस तसेच दिव्यपेय मटकी व मुगाचे उसळ आदी देण्यात आले. शेवटच्या दिवशी जगन्नाथ येईलवाड यांनी महाप्रसादाचे आयोजन केले. शिबिर समापनास आदरणीय श्री दत्तात्रय काळे राज्य प्रभारी, संजीवनी माने सह राज्य प्रभारी, मधुरी शास्त्री राज्य कार्यकारणी सदस्य, उर्मिला साजने राज्यसंवाद प्रभारी, नंदिनी चौधरी नांदेड जिल्हा प्रभारी, राम शिवपनोर नांदेड जिल्हा प्रभारी, हनुमंत ढगे संघटन मंत्री नांदेड, यांची विशेष उपस्थिती होती. नारायणराव कुलकर्णी व यादव भांगे यांनी शिबिर सामानपणाच्या दिवशी संकल्प यज्ञ केला. सर्वसाधारकांनी वाईट सवयी सोडण्याचा संकल्प करत यज्ञामध्ये आहुती दिल्या. 11 दिवसीय शिबिरा दरम्यान किशन भवर व सोपानराव काळे यांनी कठीण आसन, जलनीती, सूत्रनीती आदी चा सादकाकरून सराव करून घेतला. याप्रसंगी सर्वश्री अरुण दमकोंडवार, चंद्रकांत नागठाण, संतोष बच्चेवार, गोविंद पेडगुलवार, राजू शेट्टे, दिलीप कदम, विजय गुंडाळे, सूर्यकांत शिरनेवार, श्रीराम मोरे, शैलेंद्र पालदेवार, जगन्नाथ येईलवाड, राधाबाई येईलवाड, काशिनाथ मटके, गंगाधर कोट्टाकलुरे, गोविंद बच्चेवार, शिवाजी पेंसलवार, रामकृष्ण चक्रवार, भागवत भातलावंडे, प्रसाद भातलावंडे, भास्कर पोधाडे, जयवंत सोमवाड, शिवाजीराव शिंदे हळदेकर, बालाजी वारकड, विलास मामीरवाड, मंगला मामीडवाड, सतीश पाटील, पांचाळ बाई, ललिता कदम, पार्वती धनगरे, शोभाबाई सोमशेटवार, बेबीताई गोपीले, आशाताई गेंडाफळे वंदना चव्हाण, वर्षा राठोड, वंदना एकलारे, गंगासागर भालेराव, जयश्री सूर्यवंशी, श्रीनिवास शेळके, ऋतिक सरोदे, अनिकेत भोईवारे, गौरव भंगारे, गणेश भंगारे, सात्विक चव्हाण, देविदास लाटकर, अनिल कामिनवर आदी साधक उपस्थित होते.



# सीसीआय कापूस खरेदी केंद्रांचा शुभारंभ

## सातबारावर कापूस पेरा ऑनलाईन नोंद असणे अनिवार्य

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील आतकुर रोड वर असलेल्या मनजीत कॉटन जिंनीगमध्ये सीसीआय ( भारतीय कपास निगम )कापूस खरेदी केंद्रांचा शुभारंभ बाजार समितीचे प्रशासक जी.आर. कौलवार यांच्या हस्ते दि.१८ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आला. यावेळी ७०२० रुपये प्रति क्विंटल भाव देऊन तालुक्यातील इळेगाव येथील शेतकरी धोंडीबा संबंटवाड यांचा प्रथमता कापूस खरेदी केला.यावेळी कृ.उ.बा.समितीचे प्रशासक जी.आर.कौलवार, सीसीआय ( भारतीय कपास निगम ) चे केंद्र प्रमुख डी.के.नायक, बाजार समितीचे सचिव सी.डी.पाटील, सहसचिव वैभव देशमुख, मनजीत कॉटन जिंनीग चे मॅनेजर राजेंद्र चौधरी, ग्रेडर धरमपालजी, कॅशीयर गणेश पाटील सुर्यवंशी, व्यापारी पांडु पाटील पांगरीकर, शाम पाटील अटकळे, लिंबाजी गुर्जलवाड, राजेश रेणके, शेतकरी बालाजी वारले आदी उपस्थितीत होते. बाजारपेठेतील खाजगी व्यापा-याकडे कापसाचा भाव कमी असुन शेतकऱ्यांनी आपला कापूस सीसीआय कापूस खरेदी केंद्रांवर विक्री करावा व सातबारा वर कापूस पेरा ऑनलाईन नोंद असणे आवश्यक असुन ज्यां शेतकऱ्यांनी नोंदणी केले नसेल त्यांनी ऑनलाईन नोंद करुन घ्यावे असे आवाहन जी.आर.कौलवार यांनी केले आहे. कापूस विक्री करते वेळी शेतकऱ्यांनी सोबत कापूस पेरा, सातबारा,आधार कार्ड,व बँकेचे पास बुक झेरॉक्स प्रत कागदपत्रे आणावें व काडी कचरा नसलेला स्वच्छ कापुस आणावे असे आवाहन सचिव सी.डी. पाटील जुन्नीकर यांनी आवाहन केले आहे. शेजारी असलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांनी सुध्दा धर्माबाद सीसीआय कापूस खरेदी केंद्रांत कापूस विक्री करावा असे आवाहन बाजार समितीने केले आहे.

# इको-प्रो चे वाहणगाव शेतशिवारात "वाघ-अधिवास सत्याग्रह"

## या सत्याग्रहाच्या मागण्यातून 'सहजीवन' निर्माण करण्यास धोरणात्मक बदल करिता इको-प्रो चा संघर्ष

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गहलोत**

**चंद्रपूर :** हिवाळी अधिवेशनाच्या दहाव्या दिवशी इको-प्रो ने वरोरा-चिमूर मार्गावरील वहानगाव शेतशिवारात जाऊन "वाघ अधिवास सत्याग्रह" आंदोलन केले. ही सत्याग्रह करण्यात आलेली जागा म्हणजे ताडोबा मधील प्रसिद्ध वाघ असलेले बंजरंग आणि छोटा मटका यांच्या झुंज झालेली होय, या झुंजीत बंजरंग वाघ मृत झालेला होता. ही झुंज कोर, बफर च्या बाहेर वनक्षेत्र बाहेर शेतशिवारात झालेली होती. हा अधिवास या वाघांनी स्वीकारला असून तिथे जाऊन शासनाचे लक्ष वेधण्याचा दृष्टीने तसेच वाघाचा वावर आज जंगलाच्या बाहेर असून, वन्यप्राणी संघर्ष तीव्र आहे. वनविभागाने योजना राबविताना फक्त बफर आणि कॉरिडॉर वनक्षेत्रचा विचार न करता "वाघ अधिवास जिथे, वनविभागाच्या योजना तिथे" अशी मागणी करीत 'वाघ अधिवास सत्याग्रह' करण्यात आला.



# दिव्यांग सेना अध्यक्षपदी विठ्ठलराव देवोड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या दिव्यांग



तालुका प्रमुख पदी विठ्ठलराव देवोड मेट सावरगावकर यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आढावा बैठक शनिवारी (ता.१६) नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हा संपर्कप्रमुख बबन थोरात यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.यावेळी दिव्यांग लोकांसाठी तळमळीने काम करणारे मौजे मेट सावरगावकर येथील विठ्ठलराव देवोड यांची तालुका दिव्यांग सेना तालुका प्रमुख म्हणून यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. संपर्क प्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख बबन बारशे यांनी नवनिर्वाचित दिव्यांग तालुका प्रमुख विठ्ठल देवोड यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे. यावेळी जिल्हा उप-संघटक सुभाष नाईक किनीकर, तालुका संघटक नंदु पाटील कौठेकर, जिल्हा शिव आरोग्य सेनेचे संघटक सुनील जाधव,शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार, चेअरमन साहेबराव पाटील भोंबे, माजी सर्कल प्रमुख रमेश महागावकर, पांडुरंग कटकमवाड हे उपस्थित होते.



# होऊया रे मानव सारे; मानवी ऐक्य साधुया रे!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**शेजारी शेजारी देशांत सीमावाद, दहशतवाद, वर्ण, जात, धर्म, भाषा, संस्कृती यावरून वाद उफाळून जगात अराजकता व अशांती बळावू नये. प्रत्येक देश यथोचित प्रगती पथावर अग्रेसर रहावा. कोणीही कोणाचे हेवेदावे न करता प्रेम, बंधुभाव वृद्धिंगत व्हावे, म्हणून दरवर्षी २० डिसेंबर हा जगभरात आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. विविधतेतील एकतेचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा केला जावू लागला.**

**"हे विश्वचि माझे घर|**
**ऐसी मती ज्याची स्थिर||**
**किंबहुना, चराचर आपणचि जाहला||"**
**(संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली)**

मानव एकता म्हणजे मानवी ऐक्य अर्थात माणसांमाणसात एकजुट असणे होय. लोकांना एकमेकांशी बांधून ठेवणाऱ्या समाजात एकता आणि बांधीलकीची मानसिक भावना निर्माण करणाऱ्या सामायिक हितसंबंधांची व उद्देशांची जाणीव म्हणून एकता परिभाषित केली जाते. यूएन- राष्ट्र संघ संस्था म्हणते की एकता ही संकल्पना नेहमीच संस्थेचा एक परिभाषित भाग आहे. युनायटेड नेशन्सच्या मते, "संयुक्त राष्ट्रांच्या निर्मितीमुळे शांतता, मानवी हक्क, सामाजिक व आर्थिक विकास यांना चालना देण्यासाठी जगातील लोक आणि राष्ट्रे एकत्र आकर्षित झाली. संघटनेची स्थापना तिच्या सदस्यांमधील ऐक्य आणि सुसंवादाच्या मूलभूत तत्त्वावर करण्यात आली, जी सामूहिक सुरक्षिततेच्या संकल्पनेतून व्यक्त केली गेली. ती आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी सदस्यांच्या एकतेवर अवलंबून आहे. यापूर्वीच आध्यात्मिक विचारधारा प्रवाहित करणारे संत निरंकारी मिशनचे मानव एकता, विश्वशांती, विश्वबंधुत्व हे उपक्रम यशस्वीरित्या राबविले व अजूनही राबवतच आहे. मिशनचे युगदृष्टा सद्गुरू संतशिरोमणी हरदेवसिंहजी महाराजांनी विश्वबंधुत्वासाठी मानवामानवात ऐक्य निर्माण व्हावे, यासाठी समजावितात-

"मानव के कर्मों से धरती बसती और उजड़ती हैं|
मानव के कर्मों से दुनिया बनती और बिगड़ती हैं|
समदृष्टि समभाव से जीना सबको जब आ जायेगा|
प्यार ही बरसेगा हर सू फिर वैर नज़र न आयेगा|
सन्तमति को धारण करके सुन्दर हम व्यवहार करें|
कहे 'हरदेव' मिलवर्तन से सुखमय कुल संसार करें|"



(सम्पूर्ण हरदेव बाणीः पद - २३५ः ओळ क्र.१, २, ७, ८, ९ व १०) आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस हा शाश्वत विकास अजेंडावर आधारित आहे, जो स्वतःच लोकांना गरीबी, भूक आणि रोग यासारख्या दुर्बल पैलूंमधून बाहेर काढण्यावर लक्ष केंद्रित करतो. मिलेनियम डिक्लेरेशनच्या अनुषंगाने एकवीसव्या शतकातील आंतरराष्ट्रीय संबंधांचे एक मूलभूत मूल्य म्हणून एकता ओळखली जाते; ज्याच्या अंतर्गत ज्यांना कमीत कमी आणि ज्यांना सर्वात जास्त फायदा होतो, त्यांना मदतही होते. विज्ञानाच्या बळावर मानवाने अगणित प्रगती साधली आहे. सुखचैनीच्या वस्तू, यंत्रे, अवजारे तयार केलेल्या आहेत. काबाडकष्ट, शारीरिक श्रम करणे कमी झाले आहे. चंद्र व मंगळावर स्वारी करून तेथील वातावरणाचा शोध घेतला व तेथे तो आपले वास्तव्य- संसार थाटण्याच्या बेतात आहे. तरीही तो अशांत व बेचैन आहे. त्यासाठी त्यावर उतारा सांगतात, तो म्हणजे अध्यात्मिक ज्ञानाचा! वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात-

"शांती सुखाचे मारग बरवे!
आपण तरोनि दुजा तारावे!!
तोडिल पाश यमाचा, यमाचा!
भक्ती विन उद्धार नाही कुणाचा!!"

आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवसाचे महत्त्व असे- विविधतेत एकता दाखवण्यासाठी विविध सरकारांना आंतरराष्ट्रीय करारांची आठवण करून देणे, लोकांना एकतेचे महत्त्व पटवून देणे, शाश्वत विकासासाठी लोकांना व सरकारांना प्रेरित करणे, गरिबी निर्मूलनासाठी नवीन मार्ग शोधणे, लोकांना गरिबी, भूक, रोग यांसारख्या समस्यांमधून बाहेर काढणे. हे जरी खरे असले, तरी मानवाने तयार केलेल्या विनाशकारी शस्त्रास्त्रे, शक्तीशाली बॉम्ब, आधुनिक औजारे यांचा दुरुपयोग करून तो इतर देशासह स्वतःचाही आत्मघात करू शकतो. जगाला पुनःश्च महायुद्धाच्या खाईत ढकलू शकतो. यांवर प्रतिबंध यावा, हाही उद्देश आहे. संत निरंकारी मिशनचे महान ग्रंथकार संतश्रेष्ठ शहंशाह अवतारसिंहजी महाराज विश्व मानव एकतेची गरज विषद करताना सांगतात-

"अज साइंस ते साइंसदारानां बड़े बड़े बणाये बम्ब|
इक्को बम्ब नाल दुनियां मर जाये ऐसे ऐसे आये बम्ब|
मुरदे नूं जो जिन्दगी बख्शे मुरशद बणाई ए|
कहे अवतार मैं मरदे मरदे इस तों जिन्दगी पाई ए|"

(सम्पूर्ण अवतार बाणीः पद क्र. ३४०ः ओळ क्र.१, २, ५, व ६)

दरवर्षी हा दिवस देशांदेशात आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा करतात. असा जागतिक स्तरावर हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश्य असा, की लोकांच्या विविधतेमधील एकतेचे महत्त्व स्पष्ट करत जागरूकता पसरविणे होय. हेल्प फॉर ह्यूमेन रिसर्च अँड डेव्हलपमेंट या संस्थेने भारतीयांनाही एकतेच्या सूत्रात बांधण्यास पुढाकार घेतला आहे. दि.२२डिसेंबर २००५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने मानव एकता संदर्भात एक निर्णय घेत दरवर्षी २० डिसेंबरला आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस घोषित करण्याचा निर्णय घेतला. फेब्रुवारी २००२मध्ये दारिद्र्य निर्मूलनासाठी युएनडीपीचा जागतिक एकता कोष स्थापन करण्यात आला आहे. नवीन शाश्वत विकास उद्दीष्टे- एसडीजी पूर्णपणे लोक आणि ग्रहावर केंद्रित आहे, ज्यात मानवाधिकारांना पाठबळ दिले जात आहे. हे शक्य होण्यास संतश्रेष्ठ हरदेवसिंहजी महाराज बजावतात-

"मानवास मानव प्रिय असावा!
एकमेकांचा आधार बनावा!!"

दारिद्र्य, उपासमार आणि रोगराई यामधून लोकांना बाहेर काढण्याच्या निर्धारासाठी वैश्विक भागीदारीने समर्थित आहे. त्यादृष्टीने जागतिक सहकार्य आणि एकात्मतेची पायाभरणी केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून जगभरात आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा करतात.

!! जागतिक मानव एकता दिनाच्या सर्व मानवांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# धाडसी चुटकीची रोमांचक समुद्री सफर - चुटकीचं जग



गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**बालकांसाठी सातत्याने दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कसदार लेखन करणारे बालसाहित्यिक फारूक काझी यांनी बालकथांमध्ये अनेक प्रयोग करत दर्जेदार लेखन केले आहे. आता ते बालकावाचकांसाठी गूढ समुद्री जगाची सफर घडवत प्रेम आणि शांतीचा संदेश देणारी, सामान्य मुलीची असामान्य कहाणी सांगणारी "चुटकीचे जग" ही किशोरकादंबरी घेऊन आले आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी ही कादंबरी प्रकाशित केली आहे.**

कादंबरीची नायिका चुटकी ही लहान मुलगी आहे. मुसा, बाजी, नूहबाबा, कौस्तव, इर्डा, इब्लीस अशी इतरही पात्रं या कादंबरीचा महत्त्वाचा भाग आहेत. परंतु या कादंबरीचे संपूर्ण कथानक हे चुटकीच्या भोवती फिरत राहते. आईचे छत्र हरवलेली चुटकी आपल्या अब्बासोबत राहत असते. आजूबाजूच्यांना ती अनाथ आहे असे वाटत असते. परंतु ती खरेच अनाथ असते का? हे कादंबरीच्या शेवटी वाचकाला समजते. आपली प्रत्येक इच्छा ही जगाच्या कल्याणासाठी असावी असे सांगणारे नूहबाबा चुटकीला सतत मार्गदर्शन करत असतात. तळहाताच्या फोडाप्रमाणे चुटकीला जपणारा तिचा अब्बा म्हणजे मुसा तिला तिच्या अम्मीची कधीच आठवण येऊ देत नाही. तो तिची वेणी घालतो. तिचे सर्व लाड पुरवतो.

अगदी आनंदात जगत असलेल्या चुटकीला एक दिवस शेजारच्या काकूंकडून ती अनाथ असल्याचे समजते आणि तेव्हापासून चुटकीच्या आनंदी बालमनात वादळ निर्माण होते. तिला तिच्या आईविषयी प्रश्न पडतात. चित्रविचित्र स्वप्ने पडतात. बालमनाला त्या स्वप्नांचा अर्थ समजत नाही. अशा मानसिक अवस्थेत नूहबाबा तिला मार्ग दाखवतात. एक दिवस नूहबाबांकडे तिला समुद्री रहस्यांनी भरलेलं एक जादुई पुस्तक सापडते. ते पुस्तक तिला समुद्र देवता "पॅरिईडॉन" च्या गळ्यातील ऑक्टोपसचं चित्र असलेलं पदक देतं. इथूनच या कादंबरीच्या रहस्यमयी समुद्री जगाच्या एक एक कोड्यांना चुटकी आपल्या हिमतीच्या जोरावर सोडवायला सुरूवात करते.

छोटी चुटकी काही वेळेला घाबरते. परंतु ती धैर्य मात्र सोडत नाही. हिंमत कधी हरत नाही. आलेल्या संकटांना धैर्याने सामोरी जाते. चुटकीच्या या धाडसी मोहिमेचे एक एक प्रसंग वाचताना वाचकाला पुढे काय घडेल याची उत्सुकता लागते. समुद्री दुनियेत चुटकीला विमान मासा, समुद्र शिल्प, समुद्री ड्रॅगन, पृथ्वीवरील माणसांपेक्षा वेगळा असलेला समुद्री माणूस, समुद्री राक्षस असे कादंबरीतील नवनवीन तसेच वैशिष्ट्यपूर्ण पात्रं वाचकाची उत्कंठा वाढवतात. जगात सर्वचजण वाईट नसतात. चांगुलपणा शिल्लक असलेले जीव चुटकीला तिच्या या सफरीत मदत करतात. समुद्रलिपीत लिहिलेला "समुद्र इतिहास" , त्याला वाचणारा डॉल्फिन, चुटकीच्या मदतीला धावून येणारा हॅमरहेड मासा, माकडासारखं तोंड बेडकासारखे पाय आणि कासवाची पाठ असणारा विचित्र प्राणी हे सारं या रहस्यमयी कादंबरीतून वाचताना रोमांचक अनुभव देतात.




"चुटकी, तू खूप धाडसी आहेस. निरागस आहेस. हे राक्षस तुझं काहीच नुकसान करू शकणार नाहीत; कारण तू सच्ची आहेस. लक्षात ठेव, सत्य आणि साहस ज्यांच्या जवळ असतं त्यांना कशाचीच भीती नसते. तू घाबरू नको. भीती आपलं बळ संपवते. विचार करण्याची ताकद संपवून घेते. घाबरू नको. मुकाबला कर." कादंबरी वाचताना कादंबरीत भेटणारे नूहबाबा चुटकीला प्रेम, शांती, सत्य, साहस, धाडस याची सतत शिकवण देतात. या समुद्री सफरीत चुटकीवर अनेक संकटे येतात. या संकटातून ती कशी पार होते? कोण कोण मदत करतं? आणि कशी? हे पुस्तकातच वाचण्यात खरी मजा आहे.

समुद्राच्या खोलात भव्य जलदुर्गात इब्लिस सैतानाने राणी इर्डाला कैदेत ठेवलेले होते. तो सतत तिला तिचे टापू त्याला देण्यासाठी धमकावत असतो. परंतु निडर असलेली राणी इर्डा त्याला भीक घालत नाही. उलट ती त्याला धाडसाने सांगते, "इब्लिस, तू पापी आहेस म्हणून एवढ्या खोल समुद्रात दडून राहतोस. चांगल्या माणसाला आत्मरक्षणासाठी हत्यारं लागत नाहीत. ज्याच्या मनात प्रचंड पाप आहे. त्याच्या मनात अपार भीती वसत असते. जगाला सर्वात जास्त गरज प्रेम आणि शांतीची आहे. तुम्ही लोक त्यालाच जास्त घाबरता." पाच टापूंची राणी असलेली इर्डा, समुद्री माणूस कौस्तव आणि त्याचं कुटुंब, पाच टापूंवरील मोत्यांसाठी राणी इर्डाला बंदी बनवणारा राक्षस, टापूवरील मोत्यांचा वापर शांततेने आणि आनंदाने जगण्यासाठीच व्हायला हवा असे म्हणणारी राणी इर्डा, राक्षसासोबत युद्ध करणारा मुसा, युद्धात सैतानाला ठार मारणारी चुटकी हे सारं वाचताना वाचकाच्या अंगावर रोमांच उभा राहतो. कादंबरी वाचताना वाचकाला अद्भुत, रहस्यांनी भरलेली समुद्र सफर रोमांचक अनुभव तर देतेच सोबतच शांती आणि प्रेमाशिवाय या जगात दुसरी कोणतीच गोष्ट महत्वाची नाही हा संदेश देते.

**पुस्तकाचे नाव - चुटकीचं जग**
**लेखक - फारूक एस. काझी**
**प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस**
**मूल्य - १९५ रू.**

# बालविवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत प्रकाशित झालेल्या एका अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील तीन वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते.

आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वांनाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी.

# गांधीजीचे विचार आज मरत चालले की काय ?

आधुनिक केसरी


**जगात खास करुन दोन लोकांचा जास्त अभ्यास केला जातो. एक म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व दुसरे राष्ट्रपिता महात्मा गांधी. हे दोघंही गौतम बुद्धाच्या विचाराने प्रेरीत झालेले दिसतात. रणाविण स्वातंत्र्य जर कोणाला मिळाले तर त्यात पहिला क्रमांक भारताचा लागतो. भारतात मुळात दोन गट होते. ज्यावेळी ब्रिटीशांचं राज्य होतं. या ब्रिटीशांना हाकलण्यासाठी देशातील देशभक्ताचे जे दोन गट पडले.त्या गटाला जहाल व मवाळ गट म्हणत. जहाल गट हा क्रांतीकारी गट होता. मरेल पण सत्यच बोलेल आणि मरेल पण मारुन मरेल. मार खावून मरणार नाही. अशा विचारांचा गट. हा गट ब्रिटीशांना असहकार दाखवत होता.**

तर दुसरा गट मवाळ गट होता.ह्या गटाचं म्हणणं होतं की जर आपण इंग्रजांना मदत केली,विरोध केला नाही तर एक दिवस इंग्रजांना दया येईल व तो आपल्याला एक दिवस देश चालवायला देवून जाईल.

महात्मा गांधी येण्यापूर्वी इथे आगरकर हे मवाळ गटाचे तर टिळक हे जहाल गटाचे नेते होते. टिळकांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरुन जनतेत इंग्रजांविरुद्ध असंतोष भारतीय मनात निर्माण केला होता. त्यांनी देशात शिवजयंती गणेशोत्सव सुरु केला होता. त्यांनी स्वदेशी,शिक्षण स्वराज्य आणि बहिस्कार ही चतुसुत्री मांडून जनतेला चेतविले.त्यांनी मंडालेच्या तुरुंगात शिक्षाही भोगल्या.पण ते फार काळ जीवंत राहिले नाही.एक ऑगस्ट १९२० ला ते मरण पावले.त्यांच्या निधनानंतर देश साधारणतः पोरका झाला होता.आता कोण ?देश वाली शोधत होता.अशावेळी या देशाचं नेतृत्व स्विकारलं ते महात्मा गांधी यांनी.

महात्माजींनी बार्डोलीचा सत्याग्रह केला होता. तसेच ते बॅरीस्टर पदवीने विभुषीत असून त्यांनी आफ्रीकेत शेतक-यांसाठी केलेले आंदोलन. चंपारण्याचा सत्याग्रह इत्यादी गोष्टी त्यांनी सहज हाताळल्या होत्या.त्यामुळं या नेतृत्वहिन व पोरक्या झालेल्या समाजाला टिळकानंतर महात्मा गांधीनी नेतृत्वाची आस दाखवली.त्यांनी वेगवेगळ्या मार्गाने का होईना या देशातील समस्त बांधवांना एकत्र आणलं. नव्हे तर असहकार आंदोलनातून,सविनय कायदेभंगातून त्यांनी स्वातंत्र्याची जी ज्योत पेटवली. ती ज्योत वाखाणण्याजोगी आहे.आज आपण भारतीय बहुसंख्य असलो तरी इंग्रजी फौजेसमोर आपला टिकाव लागू शकत नाही हे महात्माजींनी ओळखलं.कारण इंग्रजांजवळ अत्याधुनिक शस्रास्रे होती.तसेच त्यांच्याकडे आपलीच भारतीय माणसे नोकरी करीत होती.हे इंग्रज एवढे धुर्त होते की ते आपल्याच माणसांकडून आपल्यावरच हल्ला करुन आपल्याच माणसांना नेस्तनाबूत करीत होती.हे मात्र आपल्याच माणसांना कळत नव्हते.जर क्रांतीकारी मार्ग अवलंबला असता तर भारतीय माणसे केव्हाच संपली असती. म्हणून महात्माजींनी अहिंसेच्या मार्गाने इंग्रजांशी लढा द्यायचे ठरवले.त्यांनी लढाईची हत्यारे बनवली. ती हत्यारे म्हणजे सत्य,अहिंसा, सत्याग्रह,असहकार ही होय.गौतम बुद्धांनी सांगीतलेला अहिंसा ह्या तत्वाने तर बुद्धाने साऱ्या जगाला जिंकलं होतं.हे महात्माजींना माहीत होतं. आज देश स्वतंत्र्य झाला ती महात्मा गांधीजींचीच देण.आजही देशाला त्यांच्या विचारांची गरज आहे. मरण आलं तरी चालेल,पण मी सत्यच बोलणार हा त्यांचाच संदेश.आजही न्यायालयात याच विचाराने शपथ घेतली जाते.गीतेची शपथ टाकली जाते.मी शपथ घेतो की मी न्यायाधीशासंमोर सत्य बोलेल,खोटं बोलणार नाही.मग बयाणं विचारली जातात.तेव्हा साक्ष द्यायला आलेले लोकं चिकार खोटं बोलतात. शपथ गेली खड्ड्यात. शिवाय वकीलही सर्रास खोटं बोलून केस जिंकून जातात.सत्य पदोपदी मरतं.ही वास्तविकता आहे.आजच्या काळात न्यायालयच नाही तर जागोजागी सत्य चालत नाही.खोटं बोलल्याशिवाय भागत नाही. पोट भरता येत नाही.मग सत्य तरी कोण बोलेल! आज मितीला जागोजागी रावणाचेच राज्य आहे. रावण तरी बरा होता,पण आज जागोजागी रावण पसरलेले आहेत. कोणी फितूरी करतात. कोणी अत्याचार करतात, कोणी बलत्कार करतात तर कोणी दवाखान्यातच मानवी अवयवाची तस्करी. सर्वत्र खोटं बोलून.....खोटा व्यवहार करुन.

आज देशात कायदेही असेच आहेत. न्यायालयातून आरोपी मोकाट सुटतात तर इमानदार शिक्षेच्या कक्षेत अडकतात. महात्माजींनी तर सविनय कायदेभंग करुन मिठाचा एकच कायदा मोडला.पण आज देशात कितीतरी कायदे मोडावेसे वाटतात.देश



स्वतंत्र असला तरी. महात्माजींनी असहकार दिलं वाईट लोकांना मदत करु नये हाच या असहकाराचा उद्देश.पण आज या असहकाराचा अर्थ आम्ही वेगळाच घेतला.तो म्हणजे चांगल्या गोष्टीला सहकार्य करु नये वाईट गोष्टीला आम्ही सहकार्य करतो.तसेच महात्माजींनी सांगीतलेले सत्याग्रह अर्थात आंदोलन. आम्ही हेही आंदोलन आमच्या स्वतःच्या स्वार्थासाठी करतो. पर्यायाने सांगायचे झाल्यास आम्ही महात्मा गांधीच्या विचारांची हत्या करीत आज सुटलेलो आहोत.आज आमची बेटी सुरक्षीत नाही.ते इंग्रज तर देश सोडून गेले आपला. पण या देशावर हे भलतेच इंग्रज येवून बसलेत. जे राज्य तर करीत आहेत.पण त्यांना सर्वसामान्यांचा विचार नाही.त्यामुळंच महात्मा गांधीच्या विचारांची आज हत्या होत असलेली दिसत आहे नव्हे तर त्यांचे विचार मरत चाललेले दिसतात. विशेषतः सांगा. सांगायचे झाल्यास महात्मा गांधी की ज्यांनी ह्या देशाला स्वतंत्र्य करण्या महत्वपुर्ण योगदान दिलं.त्या महात्माजींनाच मारायला या देशातील समस्त बांधवांनी मागे पुढे पाहिले नाही. त्या देशातील माणसे,महात्मा गांधी कितीही महान असले तरी त्यांचे विचार मांडणार काय ?ही विचार करायला लावणारी बाब आहे.खरंच महात्माजींचे विचार मरत चालले आहेत,जे विचार या देशासाठी क्षणोक्षणी महत्वाचे आहेत याचाही विचार या देशातील लोकांनी करावा.

अंकुश शिंगाडे, नागपूर
९९२३७४७४९२

# भद्रकाली ताराराणी

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही वीरांची भूमी आहे. येथे वीर माता जन्माला आल्या. जिजाऊंनी शिवाजी महाराजांना घडवले. त्यांच्याच दुसऱ्या पिढीत स्वराज्याच्या मदतीस धावून आली भोसले घराण्याची सून आणि हंबीरराव मोहिते यांची कन्या ताराराणी. शिवाजी महाराजांनंतर संभाजी राजांनी नऊ वर्षे सतत युद्ध करून स्वराज्य टिकवले. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर शाहू महाराज मुगलांच्या कैदेत गेले . राजाराम महाराजांना जिंजीवर जावे लागले. राजाराम महाराजांनी जिंजी वरून राज्यकारभार पाहिला. औरंगजेबाने जुल्फीकारखानाच्या मदतीने राजाराम महाराजांना पकडण्यासाठी १६९२ ला वेढा घातला .१६९७ ला महाराजांनी किल्ला सोडला आणि तो औरंगजेबाच्या ताब्यात गेला. त्यानंतर ३ मार्च 1700 रोजी सिंहगडावर राजाराम महाराजांचे निधन झाले.**

या सर्व घटनांच्या साक्षीदार महाराणी ताराबाई होत्या. हंबीरराव मोहिते या स्वराज्य घडवण्यामध्ये सिंहाचा वाटा उचलणाऱ्या सेनापतींच्या पोटी ताराबाईंचा जन्म झाला होता. ताराराणींना स्वराज्य व लष्कर यांविषयीचे बाळकडूच मिळाले होते. स्वराज्याची धुरा आता त्यांनी हातात घेतली. ताराराणीने चार वर्षाच्या आपल्या मुलाला (दुसरा शिवाजी) गादीवर बसवले आणि रामचंद्रपंत अमात्य यांच्या सल्याने राज्य कारभार बघण्यास सुरुवात केली.

मुघलांशी दोन हात करताना ताराराणींनी आक्रमक भूमिका घेतली. मुत्सद्दी ,कर्तृत्ववान सरदार मोघलांच्या समोर उभे केले . संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यासारख्या शूर सरदारांच्या साथीने त्यांनी मुघलांना सळो कि पळो करून सोडले . गनिमी काव्याचा त्यांनी असा वापर केला की मुघलांना जळी स्थळी काष्टी पाषाणीने मराठेच दिसू लागले . सैन्याच्या पुढे होऊन त्या सैन्याचे मनोगत वाढवत. स्वराज्याचे रक्षण करणे हे जीवनध्येय त्यांनी मराठ्यांमध्ये रुजवले होते. घोडेस्वारी मध्ये अत्यंत निपुण असणारी ही ताराराणी मूळचीच बुद्धिमान व तडफदार होती. या युद्ध कौशल्य व बुद्धीच्या आधाराने त्यांनी सतराशे ते सतराशे सात या काळात दक्षिणेत तळ ठोकून असलेल्या औरंगजेबास नेस्तनाबूत केले.

१७०५ मध्ये मराठी फौजा नर्मदा ओलांडून माळवा प्रांतात गेल्या. जिंकलेल्या भागातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करून त्यांनी स्वराज्यास आर्थिक दृष्ट्या बळकट केले.

मराठी राज्याच्या अडचणीच्या काळात कोणतेही खंदे नेतृत्व पुढे नसताना या झुंजार ताराराणीने बलाढ्य मोगल औरंगजेबास नामोहरम केले. त्यांचे पुढे मराठ्यांची अशी दहशत निर्माण केली की कुठूनही येऊन हे आपला जीव घेतील ह्या भीतीतच मोगल सैन्य राहत असे .संभाजी महाराजांचा छळ ,राजाराम महाराजांची फरपट , येसूबाई व शाहू महाराजांचे मोघलांच्या ताब्यात असणे. या सर्व गोष्टींचे शल्य हृदयात ठेवून ही रणरागिणी लढली. मराठ्यांच्या इतिहासाची ही सात वर्षे मोलाची ठरतात . या काळात ताराराणींनी राज्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली . समाजाचे नीती, धैर्य टिकवून त्यांनी खंबीर नेतृत्व दिले. मराठी राज्य जिंकण्यासाठी आलेल्या औरंगजेबाची कबर या भूमीतच खोदून तिने आपले कर्तुत्व सिद्ध केले.

**म्हणूनच कवी गोविंद म्हणतात –**

**दिल्ली झाली दीनवाणी ।**
**दिल्लीशाचे गेले पाणी।**
**ताराबाई रामराणी।**
**भद्रकाली कोपली।**
**प्रलयाची वेळ आली।**
**मुगल हो सांभाळ।**

डॉ. वैशाली काळे-गलांडे
मो.9420456918



# डॉ.विश्वपाल: भीषण वास्तवाशी सामना करणाऱ्या प्रगल्भ नायकाची कथा

आधुनिक केसरी

**प्राचार्य शिवनाथ देवढे यांची डॉक्टर विश्वपाल' ही कादंबरी नुकतीच प्रकाशीत झाली. त्यांची ही चौथी साहित्यकृती असून यापुर्वी त्यांचे 'अनामिकेचे प्रारब्ध' हा काव्यसंग्रह व 'एक होता नचिकेत' ही कादंबरी आणि 'एका शापाचा अंत' हा कथासंग्रह इत्यादी पुस्तके प्रकाशीत झालेली आहेत. परवा अनपेक्षितपणे शिवनाथ देवढे यांची 'डॉक्टर विश्वपाल' ही कादंबरी हातात आली अन् लगेच वाचून काढली. समकालीन वास्तवाचं भान ठेवून लिहिलेली ही साहित्यकृती शेवटच्या पानापर्यंत वाचकांना खिळवून ठेवते. ग्रामीण भागातील एका सुखवस्तू अशा शेतकरी कुटूंबातील मुलगा विश्वपाल याच्या भरकटलेल्या आयुष्याचा अतिशय शोकात्मक असा शेवट, हे या कादंबरीचे सूत्र आहे.**

आजची 'व्यवस्था' ही समंजस आणि शहाण्या माणसालाही अगतिक करून टाकते आणि अनेकदा त्याला गुन्हेगार बनण्यास विवश करते. इथे मूल्याधिष्ठीत जीवन जगण्याचा आग्रह धरणारा 'विश्वपाल' हा कादंबरीचा तरूण आणि उच्च विद्याविभूषित असा दमदार नायक अतिशय क्रूर आणि मुजोर व्यवस्थेशी धाडसाने संघर्ष करतो, परंतु दुर्दैवाने प्रतिशोधाच्या धगधगत्या आगीत स्वतःच जळून भस्म होतो. एका बाजूला गीता, ज्ञानेश्वरी व तुकोबांच्या गाथे सारख्या अध्यात्मिक ग्रंथातील वचने मुखोद्गत असणारा अतिशय प्रगल्भ असा हा विश्वपाल मराठी व इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाने समृध्द आणि संपन्न जाणवतो. त्याच वेळी कनिका गुप्ता या आपल्या सहकारी असलेल्या सुंदर तरूणीशी काही काळ शरीरसंबंधही ठेवतो. आपल्या मालकाला पैसे कमावून देण्यासाठी हॉटेलमध्ये 'नाईट लाइफ' साठी आवश्यक असणाऱ्या सुबिधा उपलब्ध करून देतो. त्यासाठी सारे अनैतिक उद्योग तो करतो. एकाच व्यक्तिमत्त्वाची ही दोन विसंगत रुपे सादर करताना लेखकाचे कौशल्य पणास लागलेले जाणवते, परंतु या अवघड अशा कसरतीमध्ये लेखक मात्र कमालीचा यशस्वी झाला आहे. अतिशय श्रीमंती थाटाचे आधुनिक असे आयुष्य व्यतित करणारा नायक हा आजच्या चंगळवादी आणि भोगवादी तरूणाईचे प्रतिनिधित्त्व करतो. तसेच मुंबई सारख्या मायानगरीत उच्चभ्रू समाजातील धनदांडगे आणि भ्रष्ट नोकरशहा यांच्या 'नाईट लाईफ' ची वर्णने वाचकांना चकीत तर करतातच परंतु एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. शहरातील तारांकीत हॉटेलात सुंदर गौरांगणांच्या मादक सहवासात संगीताच्या तालावर थिरकणारे मद्यधुंद लक्ष्मीपुत्र आणि त्यांच्या सरबराईसाठी सजलेली व्यवस्था, आणि एकूणच लेखकाने केलेले अचूक आणि नेमके चित्रण वाचकांना स्तिमित करते. कादंबरीचे कथानक गतिमान आहे. प्रत्येक व्यक्तिरेखा आपले अस्तित्त्व ठळकपणे दाखवते. हॉटेलचा वयस्क परंतु अनुभवी मालक हरिसिंग याचा विश्वपालवर प्रचंड विश्वास आहे. हरिसिंग आणि विश्वपाल यांच्यातील स्नेहाचे आणि आदराचे संबंध लेखकाने अनेक प्रसंगातून चित्रित केलेले आहेत. नवानगरमध्ये रखेलीसह राहणाऱ्या लिकरकिंगला आपल्या बुध्दीचातुर्याचा चापर करून नायक विश्वपाल ज्या पध्दतीने नामोहरम करतो, ती दाखवलेली कल्पकता लेखकाच्या उत्तुंग प्रतिभेची चुणूक दाखवून जाते. शेवटी स्वैराचारी आणि अनैतिक विश्वातून बाहेर पडण्याचा विश्वपालचा प्रयत्न, हे त्याच्यावर खोलवर झालेले संस्कार दर्शवतात. 'पैसा' ही खूप मोठी ताकद असून त्यामुळे समाज व राजकीय व्यवस्थेतील कोणाही उच्च पदस्थांना वाकविता येते, पवित्र समजलेले शिक्षण क्षेत्रही त्यास अपवाद नाही, हा महत्त्वाचा संदेश लेखक सहजपणे देतो. उर्वरित जीवन अतिशय शांतपणे आणि आनंदाने आपले ज्ञानादानाचे कार्य पाडण्याचे ठरवून पावले टाकणाऱ्या विश्वपालला शेवटी अपयश येते. संस्थाचालकाचे गुंड त्यास कायदा हातात घ्यायला




भाग पाडतात, आणि मग सुरू होतो एक सुडाचा संघर्ष..... या सुंदर आणि भावस्पर्शी कादंबरीचा शेवट कसा होतो हे समजून घेण्याकरिता वाचकांना ही कादंबरी वाचण्यासाठी मी शिफारस करतो. इंग्रजी कवी जॉर्ज कुपरच्या कवितेवर केलेली चर्चा असो की विद्यमान शैक्षणिक वातावरणावर वेळोवेळी विश्वपाल याने केलेले भाष्य असो, ही या कादंबरीतील सौंदर्यस्थळे वाचकांना मोहित करतात. लेखक शिवनाथ देवढे यांची भाषा खूप साधी, सोपी आणि प्रवाही आहे. ग्रामीण व शहरी जीवनातील वातावरणाचा लेखकाला असलेला अनुभव याचे प्रत्ययकारी चित्रण कादंबरीत ठिकठिकाणी आपासुक येते. लेखकाने स्वतः जवळपास तीन तपांहून अधिक काळ अध्यापन केले असल्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्या मानसिकतेवर अचूक भाष्य करताना लेखक कोठेही कचरताना दिसत नाही.संभाजीनगर येथील रजत प्रकाशन या राज्यातील नामवंत अशा प्रकाशन संस्थेने ही कादंबरी अतिशय देखण्या स्वरुपात वाचकांसमोर सादर केलेली आहे. अनिल जोशी यांनी रेखाटलेले कादंबरीचे मूखपृष्ठ सुचक आणि सुंदर आहे. ही कलाकृती सर्वांनीच वाचावी अशी आहे. चवदार पुनरावलोकनः मिलिंद काटे, डॉ. विश्वपाल लेखक - प्राचार्य शिवनाथ देवढे, शेवगाव, जि. अ.नगर मो.८८०५९८२१२१ प्रकाशक- रजत प्रकाशन, संभाजीनगर

# ठाकरे शिवसेनेचा राजकीय यू टर्न का ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**केवळ मुख्यमंत्री पदासाठी भाजपासोबत युती तोडल्यानंतर ठाकरे शिवसेना भांबावल्यासारखी राजकिय भुमिका कशा प्रकारे घेवु लागली?हे समोर आलं. राज्यात सत्तेवर असताना राष्ट्रीय स्तरावर युपीएचं नेतृत्व शरद पवारांनी करावं एवढेच नव्हे तर पंतप्रधान पदाची ते उमेदवार करण्याची मागणी खा.संजय राऊतांनी जाहिरपणे बोलुन दाखवलेली होती. राजकिय समीकरण बदलले पवारांची राज्यात ताकद कमी झाली.**

त्या पार्‌भुमीवर मात्र पुन्हा ठाकरे शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी राजकिय यु टर्न घेत काल दिल्लीत पार पडलेल्या इंडी बैठकीत पवारांच्या नावाचा साधा उल्लेख न करणे म्हणजे महाराष्ट्राला दिल्लीरासमोर झुकवल्यासारखंच म्हणावे लागेल. त्या बैठकीतली दुसरी बाजु म्हणजे मल्लिकार्जुन खरगे पंतप्रधानाचा चेहरा होण्यासाठी तयार नाहीत याचाच अर्थ देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी 2024 नंतर हॅटट्रिक करणार त्यांच्यासमोर आपला निभाव लागणार नाही हे लक्षात आल्याने इंडी बैठकीत खरगेंचे पायाला थरकाप झाला. नव्हे तर घाबरले म्हणावे लागेल. परिणाम चेहरा होण्यासाठी नकार दिला. पंतप्रधान मोदी यांना आगामी लोकसभा निवडणुकीत विरोध करण्यासाठी देशाच्या राजकारणातले जवळपास 27 पक्ष एकत्र येवु पहातात. बेंगलोर,मुंबईच्या बैठका कशाबशा घेतल्या. पंधरा दिवसापुर्वी दिल्लीत तिसरी बैठक होणार होती. त्याला अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, केजरीवाल आदींनी अनुपस्थिती दाखवली. तेव्हा रद्द झालेली बैठक काल पार पडली. देशात तिसया बैठकीपर्यंत राजकिय समीकरण बदलुन गेल्याचे सर्वांनी मान्य केलं. नुकत्याच पाच राज्यात विधानसभा निवडणुका पार पडल्या. राजस्थान, मध्यप्रदेश,छत्तीसगड 100 टक्यांनी कमळ फुलले. इंडिया बैठकीत सहभागी असलेल्या कोणत्याही पक्ष नेतृत्वाला एवढा दारूण पराभव राजस्थान, मध्यप्रदेशमध्ये होईल असं वाटलच नाही. कारण राजस्थानमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता होती. आत्मविाास मोठा होता. पण तिथेही काँग्रेसमुक्त राजस्थान झाला. मध्यप्रदेशात मिळालेले यश अभुतपुर्व म्हणावे लागेल. काँग्रेसनं माध्यमाच्या आडुन तर्कवितर्क बांधले होते. जणुकाही मध्यप्रदेशात आम्ही सत्तेवर आलो या आविर्भावात निवडणुक लढवली. पण मोदी नेतृत्वाचा वारू या राज्यासह छत्तीसगडमध्ये देखील कुणीच रोखु शकले नाही. निवडणुक पुर्व रंगात इंडी आघाडीने विजयाचे उसणं अवसान आणले होतं पण प्रत्यक्षात घडले ते वेगळे. त्यानंतर कालची बैठक दिल्लीत होताना इंडियाच्या प्रत्येक नेत्याची चेहरं सुकलेली होती. कारण कुठल्याही राज्यात भाजपला पराभव त्यांना करता आला नाही. या बैठकीसाठी राज्यातुन उद्धव ठाकरे, शरद पवार, संजय राऊतांची उपस्थिती होती. वेगवेगळ्या प्रश्नावर बैठकीत झालेली चर्चा पुढे आली. मग जागावाटप असेल किंवा संभाव्य सभा कुठल्या राज्यात घ्यायच्या कशा प्रकारे मोदींना विरोध करायचा? याची रचनात्मक कार्यपद्धती सिद्ध झाली असावी. या बैठकीतलं वैशिष्ट म्हणजे पंतप्रधान पदासाठी उमेदवार म्हणुन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचं नाव पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सुचविले. खरं तर तिसयाच बैठकीत पंतप्रधान पदाचा चेहरा सुचवण्याची घाई ममता दिदी आणि केजरीवाल यांना का झाली असावी? याचं राजकिय संशोधन जर केलं तर कदाचित शरद पवारांचं नाव कुणी तरी पुढे येईल आणि ते बॅनर्जींना मान्य नव्हतं. म्हणुन त्यांनी उतावीळ स्वभावाप्रमाणे नाव सुचवुन टाकले.

**मल्लिकार्जुन खरगे का घाबरले?**

इंडिया बैठकीत पंतप्रधान पदासाठी खरगेंचं नाव सुचवल्यानंतर त्यांच्या पायाला बैठकीतच थरकाप उडाला असावा. कारण त्यांनी अगोदर निवडणुक जिंकण्याचे बघु, मग नावाचा विचार करू अशी भुमिका घेतली. खरं तर पंतप्रधान पदासाठी नाव आल्यानंतर छाती फुगवुन खरगेंनी सहमती द्यायला हरकत नव्हती. फार मोठी संधी त्यांना बैठकीत चालुन आल्यानंतर नको म्हणाले. याचा दुसरा अर्थ असा की 2024 नंतर देशाच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी राजकियदृष्टा हॅटट्रिक करणार जागा म्हटलं तर 400 पार होणार. त्यांच्यासमोर आपला निभाव लागणार नाही लक्षात आल्याबरोबर त्यांनी तात्पुरत्या नावाने खुर्चीवर बसायला सहमती दिली नाही. कारण खरगे हे देशाच्या राजकारणातील जुने जाणते अनुभवी वरिष्ठ नेते असुन राजकिय



कल त्यांना चांगला ओळखता येवु शकतो. ते भविष्य ओळखुन त्यांनी कदाचित पंतप्रधान पदाचा चेंडू पदरात घेतला नाही. एवढेच नाही तर ते घाबरले असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही. जागा वाटप किंवा पंतप्रधानाचा चेहरा कदाचित आगामी काळात होणाया बैठकीत जाहिर होईल तो भाग वेगळा पण आज खरगे घाबरले हे निश्चितच.

**शरदचंद्र पवारांचे काय?**

महाविकास आघाडी राज्यात सत्तेवर असताना मुख्यमंत्री पदी उद्धव ठाकरे होते. वास्तविक पहाता 2019 ला मतदारांनी जनाधार भाजप-शिवसेना महायुतीला दिला होता. पण केवळ मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीसाठी तत्कालीन काळात शिवसेनेने भाजपला धोका देत बाजुला ठेवले. शरद पवारांना सोबत घेत काँग्रेस सोबत महाविकास आघाडी सत्तेत आली. तब्बल अडीच वर्षे कारभार उद्धव ठाकरेंनी केला. हा इतिहास आणि त्यातली गंमत सांगायचं झालं तर 2020-21 मध्ये आजच्या ठाकरे शिवसेनेने खा.संजय राऊतांच्या माध्यमातुन म्हटलं होतं की देशाचं युपीए अध्यक्ष शरद पवारांनी स्विकारावं नव्हे तर पवार साहेब पंतप्रधान पदाचे उमेदवार असु शकतात. एवढं जाहिर बोलुन तशा प्रकारची मागणी करून देखील कालच्या बैठकीत पवारांच्या नावाचा उल्लेख जिथे उद्धव ठाकरे स्वतः उपस्थित असताना केला नाही. खया अर्थाने खेदाची बाब म्हणावी लागेल. त्या बैठकीत पंतप्रधान पदाचा चेहरा म्हणुन शरदचंद्र पवारांचं नाव ठाकरे किंवा संजय राऊतांनी जरी घेतलं असतं तरी महाराष्ट्रातील जनतेचा स्वाभिमान दाटुन आला असता.पण केवळ सत्तेसाठी लाचारी करायची आणि विरोधकांना विरोध करायचा म्हणुन नको त्या पंगतीला जावुन बसल्यानंतर समोर जी वाढ आली ते स्विकारायचं या भुमिकेत काल उद्धव ठाकरे दिसुन आले. राज्यातल्या शिंदे-फडणवीस-पवार सरकारला संजय राऊत नेहमीच दिल्लीला का गेले? महाराष्ट्र दिल्लीसमोर गहाण ठेवला? असं म्हणत हिणवतात. मग कालच्या इंडिया बैठकीत याच मंडळींनी महाराष्ट्र राष्ट्रीय काँग्रेस अर्थात सोनिया दिल्लीरासमोर गहाण खत लिहुन ठेवताना त्यांना काही कसं वाटलं नाही? हा प्रश्न आता जनतेला पडला. एका बैठकीत खरगेंच्या नावाला डोलदार मानं हालवत सहमती देवुन ही मंडळी परतली. तिथे मग महाराष्ट्राचा स्वाभिमान का गहाण ठेवला? साधं युपीए समन्वयक म्हणुन देखील पवारांच्या नावाचा उच्चार ही मंडळी करू शकली नाही. ममता दिदी यांनी सुचवलेल्या नावाला सहमती देवुन हे परतले. राजकिय समीकरण बदलल्यानंतर कशा प्रकारे यु टर्न देशाच्या राजकारणात ठाकरे शिवसेनेने घेतला हे कालच्या इंडी बैठकीतुन कळुन चुकलं. हे नेमकं का केलं? त्यामागे देखील इतिहास असुन राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी पक्ष फुटला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार बाहेर पडून सत्ताधायासोबत आले. एवढेच नव्हे तब्बल 40 आमदार बाहेर पडल्याने राजकियदृष्टा पवारांची अवस्था महाभारतात शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यासारखी झाली. हे लक्षात येताच उद्धव ठाकरे संजय राऊतांनी दिल्लीत जावुन भुमिका बदलली. त्यांच्या तोंडाला पवारांचे नाव आलेच नाही. कदाचित राज्याच्या राजकारणात देखील मोठा साहेबांसोबत राहतील का नाही? भविष्यकाळ ठरवेल.इतिहासाची आठवण खा.संजय राऊतांनी करून देण्यासाठी लिहिण्याचा एवढा खटाटोप.बस्स.

# 'त्या' वादग्रस्त शिक्षकाला सेवेतून बडतर्फ करा

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**बुलढाणा :** संग्रामपूर तालुक्यातील मारोड गावातील विलगीकरण कक्षातील शौचालयाची सफाई ८ वर्षांच्या चिमुकल्या विद्यार्थ्याकडून करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकारची दि. ३० मे २०२१ रोजी संपुर्ण राज्य भरात चर्चा झाली होती. प्रशासनाने दखल घेऊन येथील मुख्याध्यापक महेंद्र रोठे वर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली होती. मात्र परत त्याच शाळेवर रुजू करण्यात आले असल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी मुख्यपालन अधिकारी यांच्या कडे करण्यात आली आहे. संग्रामपूर पंचायत समिती शिक्षण विभागाचा अजब कारभार सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. येथील या विभागातील बरेच प्रकार अशोभनीय असल्याचा प्रकार वेळोवेळी घडला असून सदर विभाग मेटाकुटीला आणले आहेत. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी राज्य शासनाने विलगीकरण गावागावांत शाळा खोल्यांत विलगीकरण कक्ष उभारण्याचे निर्देश दिले असता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गावातील कोरोनाच्या संशयित रुग्ण व्यक्तीना विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले होते. या धर्तीवर विलगीकरण कक्षातील शौचालय लहान मुला कडून स्वच्छ करण्यात आले असल्याने सदर प्रकार येथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र रोठे यांना मुख्याधिकारी यांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आले होते. त्यांना निलंबित काळात लोणार येथील पंचायत समिती अंतर्गत राहण्याचा




आदेश दिला होता. मात्र त्यामधील एक तत्कालीन निलंबित मुख्याध्यापक महेंद्र रोठे हे संग्रामपूर पंचायत समिती अंतर्गत बोडखा येथील शाळेवर कार्यरत आहेत व त्यांची प्रतिनियुक्ती सदर ज्या शाळेवरून त्यांना निलंबित केले होते. त्याच मारोड येथील शाळेवर प्रतिनियुक्ती शिक्षण विभागाने केली आहे. सदर वादग्रस्त शिक्षक या ठिकाणी कसा? हा प्रश्न निर्माण झाला असून शिक्षण विभागाचे वावडे निघत आहे. अजब व गजब प्रकार पुन्हा शिक्षण विभागाचा चव्हाट्यावर आला आहे.या शिक्षकाला सेवेतून बडतर्फ करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी बहुजन पत्रकार संघाचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष भाऊ भोजने यांनी निवेदनाद्वारे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी सह आदी शासकीय विभागाकडे करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करावी अन्यथा गणतंत्र दिनाला लोकशाही मार्गाने आंदोनलाचा ईशारा देखील देण्यात आला आहे.

# सांगलीत शनिवार, रविवारी ३६ वे राज्य पक्षीमित्र संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनेच्या मान्यतेने आणि बर्ड साँग एज्युकेशन रिसर्च आणि पब्लिकेशन क्लब सांगलीच्या पुढाकाराने ३६ वे महाराष्ट्र राज्य पक्षी मित्र संमेलन २३ आणि २४ डिसेंबरला शांतीनिकेतन लोक विद्यापीठाच्या निसर्गरम्य प्रांगणात संपन्न होणार असून त्याला जोडूनच २२ डिसेंबरला पक्षांची भाषा या विषयांवर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदही होणार असल्याची माहिती संमेलनाच्या आयोजन कमिटीचे अध्यक्ष शरद आपटे यांनी बुधवारी दिली. संमेलनाचे उदघाटन, पश्चिम घाट पर्यावरण आणि संरक्षक राजेंद्र केरकर यांच्या हस्ते होणार असून या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ वन्यजीव अभ्यासक आणि संवर्धक माजी मानद वन्यजीव रक्षक तथा महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य अजित ऊर्फ पापा पाटील हे असणार आहेत. तर ज्येष्ठ वन्य जीव अभ्यासात बीएनएचएसचे संचालक आणि सातपुडा फाउंडेशनचे संस्थापक किशोर रिठे हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत. डॉ.इरच भरूचा, फेदर लायब्ररीच्या संस्थापिका इशा मुन्शी, आयसर पुण्याचे श्रेयस माणगावे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

# भोकर काँग्रेस कार्यालयात गाडगेबाबा पुण्यतिथी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** स्वच्छतेचे महान पुजारी अंधश्रद्धेवर कडाडून टीका करणारे, गावागावात जाऊन हातात झाडू घेऊन स्वच्छ गाव करणारे संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त बुधवारी (ता. २०) तालुका काँग्रेस कमिटी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, गोविंद बाबा गौड पाटील, संचालक रामचंद्र मुसळे, राजेश अंगरवार, अत्रिक पाटील मुंगल, पत्रकार बी.आर.पांचाळ, बाबुराव पाटील,मिर्झा ताहेर बेग, मोहन राठोड, विक्रम क्षीरसागर, विठ्ठल माचनवार, आदिनाथ चिंताकुटे ,सचिन पांचाळ, वैजनाथ शिरसागर, बाबुराव तेलंग, भूमन्ना मंड गीलवार आदींची ऊपस्थिती होती.



# महाराष्ट्राचा मुख्यमंत्री ओबीसी समाजाचा हवा : संतोष मिरकर

## फुलंब्री शहरात सकल ओबीसी समाजाचा एल्गार मोर्चा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शहरात काल दिनांक 19 डिसेंबर मंगळवार रोजी सकल ओबीसी समाजाच्या वतीने ओबीसी समाजाचा आरक्षण बचाव साठी मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये औरंगाबाद जिल्हा व फुलंब्री तालुक्यातील ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओबीसी समाजाचा मोर्चा शहरातील महात्मा ज्योतिबा फुले चौकापासून तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारापर्यंत गेला होता.नंतर सभेत रूपांतर होत प्रमुख नेत्यांनी उपस्थित असलेल्या जनसमुदायाला संबोधित केले. यावेळी व्यासपीठावर समता परिषदेच्या जेष्ठ नेत्या पार्वतीबाई शिरसाट, समता परिषदेचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष मनोज घोडके व संतोष मिरकर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे संतोष मिरकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले, ते म्हणाले की, महाराष्ट्रात ओबीसी समाज एकजुट आहे, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आमचा ओबीसी समाजाचा विरोध नाही परंतु त्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे. तसेच मनोज घोडके यांनीही मनोज जरांगे पाटील यांच्या वर टीका करत सुनावले, आमचे नेते छगनराव भुजबळ यांच्या विरोधात बोलूनच तुम्ही मोठे झाले , म्हणून ते एका रात्रीतुन मोठे नेते झाले नसता त्यांना कोणीही विचारला नसता असेही ते म्हणाले. ओबीसी समाजात समस्त आठरा पगड जाती आहेत त्यांना कोणत्याही प्रकारची सवलत मिळत नाही. यात मराठा समाज आला तर आमच्या वर अन्याय होईल. यासाठी आम्ही एकजुट होत आहे. समता परिषदेच्या जेष्ठ नेत्या पार्वतीबाई शिरसाट यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार संदिप शेरकर यांनी मांडले. नंतर फुलंब्री चे तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी समस्त ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## पत्रकारांचा निवास प्रश्न सोडविण्यास प्राधान्य : ‘व्हॉईस ऑफ मीडिया’चे संस्थापक संदिप काळे

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** पत्रकारांची देशव्यापी संघटना असलेली ‘व्हाईस ऑफ मीडिया’ ही संघटना पत्रकारांच्या कुटुंबियांच्या समस्या निवारणासाठी अग्रस्थानी आहे. या पार्श्वभुमीवर पत्रकारांच्या पाल्यांना वितरीत करण्यात येणा*या शैक्षणिक साहित्य किट वितरणाचा शुभारंभ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते आज १९ रोजी वाशीम येथे करण्यात आला. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप काळे यांनी पत्रकारांचा निवास प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन केले.

पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशन काळात नागपूर येथे ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ने तीन दिवस साखळी उपोषण करुन पत्रकारांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. तर मंगळवारी संघटनेच्या वरिष्ठ पदाधिक*यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेवून पत्रकारांच्या समस्या सोडविण्याची आग्रही मागणी केली. यानंतर परतीच्या प्रवासात संदिप काळे यांनी वाशीम येथे ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या जिल्हा पदाधिका*यांची भेट घेतली. याप्रसंगी संघटनेकडून पत्रकार पाल्यांसाठी दिल्या जाणा*या शैक्षणिक किट वितरणाचा शुभारंभ संदिप काळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा पदाधिका*यांशी चर्चा करताना काळे यांनी वाशीम जिल्ह्यातील पत्रकारांच्या निवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी पत्रकार आवास योजना राबविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या. सोबतच पत्रकारांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी संघटना शासन दरबारी पाठपुरावा करुन निवासाचा प्रश्न प्राधान्याने सोडविणार असल्याची ग्वाही दिली. दरम्यान, संघटनेचे संस्थापक संदिप काळे यांनी वाशीम जिल्ह्यातील संघटनेच्या कामाचा आढावा घेत जिल्हाध्यक्ष व संपूर्ण चमुच्या कामाचे कौतुक केले. यावेळी जेष्ठ पत्रकार नंदकिशोर शिंदे, नंदकिशोर वैद्य, ‘व्हॉईस ऑफ मीडिया’चे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, विदर्भ कार्याध्यक्ष विठ्ठल देशमुख, विदर्भ कार्यवाह धनंजय कपाले, जिल्हा कार्याध्यक्ष सुनील पाटील, जिल्हा सचिव रमेश उंडाळ, जिल्हा प्रवक्ता देव इंगोले, जिल्हा उपाध्यक्ष आकाश शिंदे, गणेश मोहळे, जिल्हा संघटक संदीप डोंगरे,प्रदीप पिंपळकर आदिंची उपस्थिती होती.

## संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथीनिमित्त माणुसकी वृद्धाश्रमात अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने माणुसकी समुहाच्या वतीने माणुसकी वृध्दाश्रमात गाडगेबाबाना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी गाडगेबाबांच्या प्रततीमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. समाजसेवक सुमित यांनी गाडगेबाबांची प्रेरणा घेवून समाजसेवेला सुरवात केली आहे.राष्ट् संत गाडगे बाबांचे प्रेरनादाई वीचार अडाणी राहू नका,मुला-बाळांना शिकावा,जो वेळेवर वीजय मिळवतो तो जगावरही वीजय मिळवतो,दगड धोंड्यांची पूजा करण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवू नका,दान घेण्यासाठी हात पसरू नका,दान देण्यासाठी हात पसरा,दुःखाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाही, धर्माच्या नावाखाली कोंबड्या बकऱ्या सारखे मुके प्राणी बळी देवू नका,माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते आई बाप, माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे हाच बोध मी ग्रहण केला आहे, शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते आपण ह्या जगात कशासाठी आलोत हे कळते, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. अभिवादन कार्यक्रमासाठि उपस्थिताना श्रीमती वर्षा व्हगाडे स.नो.पी.रेल्वे लोहमार्ग व आरती जाधव स.नो.पी. दामीनी पथक ग्रामीण संभाजीनगर यांनी गाडगेबाबा यांचे वीचार सांगीतले यावेळी उपस्थित माणुसकी समुहाचे मार्गदर्शक वर्षा व्हगाडे, स.नो.पी.रेल्वे लोहमार्ग, आरती जाधव स.नो.पी. दामीनी पथक ग्रामीण,पुनम चव्हाण माजी सरपंच, समाजसेवक सुमित पंडित, अरुण महाराज,नंदु चव्हाण, सचीन राठोड, रमेश राठोड, सुनिल चव्हाण, प्रा.शरद सोनवणे, सौ पूजा पंडित व माणुसकी वृध्दाश्रमातील वृध आदी उपस्थित होते.





## स्वच्छ व हरितगाव यावर काम करण्यासाठी किनगाव ग्रामपंचायतची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील किनगाव येथे विकास मीना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर याच्या संकल्पमधून आदरणीय डॉक्टर रामावत यांच्या मार्गदर्शनाखाली शास्वत विकासाचे ध्येय मधील ९ थीम पैकी स्वच्छ व हरित गाव यावर काम करण्यासाठी किनगाव ग्रामपंचायतीची निवड झाली त्या अनुसंगाणे जनजागृती व गाव अंतर्गत स्वच्छ मोहीम आज किनगाव येथे राबण्यात आली याप्रसंगी सरपंच मनीषा अनिल चव्हाण उपसरपंच किशोर चव्हाण ग्रामपंचायत सदस्य सुधाकर तावडे अमोल सोनवणे तुकाराम साळवे संतोष चव्हाण रमेश सोनवणे ग्रामविकास अधिकारी अरुण चिते स्वच्छता अभियान समिती अध्यक्ष बाळासाहेब शिंदे मुख्याध्यापक वाघ सर कुवर सर सचिन चव्हाण सुभाष चव्हाण न्यू हायस्कूल शाळा जिल्हा परिषद शाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## तेली समाज वधूवर संपर्क मेळाव्यास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सकल तेली समाज व तेली सेनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये राज्यस्तरीय तेली समाज वधू वर संपर्क मेळावा नुकताच पार पडला. राज्यभरातून विवाह इच्छुक वधू वर मोठ्या प्रमाणात आले होते सदरिल मेळाव्यात ३७५ तरुण तरुणींनी नाव नोंदणी केली होती. या सर्व तरुण तरुणींनी आपला जोडीदार कसा हवा अशा अपेक्षा व मनोगत व्यक्त केले या आधुनिक पद्धतीच्या मेळाव्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

या मेळाव्या संदर्भात संयोजक गणेश पवार यांनी सांगितले की हा मेळावा आधुनिक पद्धतीचा नव्या विचारांचा आणि दिशादर्शक ठरलेला आहे. अनिष्ठ रूढी, प्रथा परंपरा यांना थारा देण्याऐवजी आम्ही हा मेळावा आयोजित करतांना आधुनिक विचारसरणीवर भर दिला आहे. या मेळाव्या मध्ये तरूण तरूणींनी आपले विचार धाडसपणाने मांडले या मेळाव्यात प्रत्येक तरुण-तरुणींना बोलण्याची संधी देण्यात आली होती या मेळाव्याचे उद्घाटन उपस्थित समाज बांधवांच्याच उपस्थिती मध्ये पार पाडले.



कार्यक्रम वेळेतच सुरू करून जास्त जास्त वधू वरांचा परिचय संपर्क करून देण्यात आला.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण व ओबीसी मंत्री अतुल सावे* यांच्या विशेष सहकार्याने व भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अनिल मकरिये,तेली समाजाचे नेते कचरू वेळंजकर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.कल्याण काळे, रविंद्र काळे,ह.भ.प.प्रभाकर बोरसे महाराज, ह.भ.प.संगिता काजाळे,समाज सेवक एकनाथ पेंढारे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे विभागीय निरीक्षक संजय आंबेकर आम्ही तेली जय संताजी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेशप्रसाद आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक श्रीराम कोरडे ,गणेश वाडेकर,सुनिल क्षीरसागर सुभाष वाळके,लक्षम राऊत,दत्त भोलाने,कृष्णा सोनवणे,अर्चना फिरके,रंजना बागूल,गायत्री चौधरी,विशाल खर्गे,अशा राऊत समीक्षा बागुल,साक्षी पवार,आदींनी परिश्रम घेतले प्रस्तावित कृष्णा सोनवणे परतूर यांनी केले तर सुत्रसंचलन लंका भवर,धनश्री आंबेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय आंबेकर यांनी केले. तसेच भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुभ संदेश पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री राज्यमंत्री श्री रावसाहेब दानवे दादा यांनीही दुरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.



# चारठाणा प्रा.आ.केंद्रात ५५ महिलांवर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील ५५ महिलांवर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजनाच्या बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया रविवार दि १७ डिसेंबर रोजी करण्यात आल्या. जिल्ह्यात सर्वच आरोग्य केंद्रामधून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरे सुरू होत असून ज्या आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था नाही अशा आरोग्य केंद्रातील लाभार्थी दुसऱ्या ठिकाणी जाऊन शस्त्रक्रिया करून घेताना दिसत आहेत. चारठाणा आरोग्य केंद्रातील यावर्षीचे हे तीसरे शिबिर असून पहिल्या शिबिरात एकूण ५२ महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. तर दुसऱ्या शिबिरात ७३ महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. तर आज झालेल्या तिसऱ्या शिबिरात ५५ महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पार पडल्या या तिन्ही शिबिरात एकुण १८० महिलांवर कुटुंब नियोजन यशस्वी शस्त्रक्रिया संपन्न झाल्या. यावेळी बीड येथील लेप्रोस्कोपी सर्जन डॉ अशोक मुंडे यांनी या महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया केली. शिबिर यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ मनीषा उत्तमराव आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ श्वेता रावळे, डॉ. अनिल जांगीड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ सुनील गांजरे, डॉ प्रणिता पाटील , औषध निर्माण अधिकारी विजय ढाकणे, आरोग्य सेवक मिलिंद लाटे, दत्ता वायाळ, आरोग्य सहायीका सुनंदा पवार, आरोग्य सेविका अलका कुरई, कमल घुगरे, सुमन ठाकरे, निर्मला झळके, सीमा सातपुते, सारिका कांबळे, सोमनाथ खके, वैजनाथ मुंजे, संजय डोंबे आदींनी प्रयत्न केले.

# देऊळवाडी येथे दत्त जयंतीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** जिल्ह्यातील उरण तालुक्यातील उरण शहरामध्ये देऊळवाडी येथे श्री दत्त मंदिर हे जागृत देवस्थान आहे. हिंदू धर्मात महत्वाच्या देवतेपैकी भगवान श्री दत्तात्रेय हे अनेक पंथाचे, अनेक उपासकांचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे हिंदू धर्मात दत्त उपासनेला अनन्य साधारण



महत्व आहे. त्यामुळे अनेक विविध जिल्ह्यातून भाविक भक्त नेहमी श्री दत्त मंदिर देऊळवाडी, उरण शहर येथे दर्शनासाठी नेहमी येत असतात.मंदिराची तसेच मूर्तीची स्थापना होऊन ९७ वर्षे पूर्ण झाली असून श्री दत्त मंदिराची सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल सुरु आहे. दरवर्षी दत्त जयंती निमित्त उरण मध्ये खूप मोठी यात्रा भरत असते.यंदा मंगळवार दि २६ डिसेंबर २०२३ रोजी दत्तजयंती असल्याने दत्त जयंतीचे औचित्य साधून देऊळवाडी येथील श्री दत्त मंदीरात पहाटे ३ वाजता श्रीचा अभिषेक, दुपारी १२ वाजता श्रींची आरती व नैवेदय, रात्री ९ वाजता श्रीचा पालखी सोहळा असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराचे पुजारी ओमकार बैरागी यांनी दिली. दरवर्षी देऊळवाडी यूवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळातर्फे भाविभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. यंदाही भाविक भक्तांसाठी श्री दत्त मंदिर, देऊळवाडी येथे दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी देवदर्शन घेउन महाप्रसादाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा. असे आवाहन देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अब्दुल समीर उपनगराध्यक्ष यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथील युवानेते तथा उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. तालुका शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच मित्र मंडळाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ व ब्लॅंकेट तसेच शहरातील बाळकृष्ण मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना अभिष्टचिंतन मूर्ती अब्दुल समीर यांच्याहस्ते ब्लॅंकेट व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यासोबतच शहरातील शिवसेना भवन येथे बांधकाम व इतर कामगार मंडळ अंतर्गत लाभार्थ्यांचे केवायसी करण्यासंदर्भात शिबीर घेण्यात आले.वाढदिवसानिमित्त शहरातील शिवसेना भवन सह विविध ठिकाणी अब्दुल समीर यांचा अभिष्टचिंतन सोहळा पार पडला.सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सिल्लोड येथे जाऊन उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करुन शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी विविध ठिकाणी उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांचा साखर तुला, लाडू तुला कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्यावर सामाजिक, राजकिय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला.वाढदिवसानिमित्त थोऱ्या मोठ्याचे आशीर्वाद, मित्रजनांच्या शुभेच्छा आयुष्यात कायम प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन यावेळी अभिष्टचिंतन मूर्ती अब्दुल समीर यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले. आपल्यातील ऋणानुबंध असाच कायम रहावा अशी प्रार्थना करत वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवून दिलेल्या शुभेच्छा बद्दल उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी आभार मानले. नांदा तांडा मित्र मंडळ, शंभूगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने अब्दुल समीर यांचा साखर तुला, लाडू तुला कार्यक्रम घेऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. विविध ठिकाणी झालेल्या अभिष्टचिंतन सोहळा प्रसंगी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण, माजी सभापती उस्मान पठाण, रामदास राठोड, एकनाथ राठोड,समाजसेवक तथा माजी सरपंच दारासिंग चव्हाण,कन्हीराम राठोड, गणेश खैरे, मुख्याध्यापक योगेश चोपडे, ममराज जाधव, ममराज चव्हाण, आर्दिसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरमसाठ महागाईमुळे सर्वसामान्यांचे बेहाल

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** महागाईने रौद्ररूप धारण केले असून कमी होण्याचे नावच घेत नसल्याने महागाईने सर्वत्र कहरच केला आहे. अपुऱ्या पावसामुळे महागाई आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात महागाई वाढण्याचे संकेत असून या वाढत्या महागाईचा फटका गरीब आणि मध्यमवर्गीयांनाच जास्त बसत आहे. मागणी वाढली आणि पुरवठा कमी




असला म्हणजे वस्तूंचे दर वाढतात हा अर्थशास्त्राचा नियम आहे. वाढत्या महागाईमुळे मध्यमवर्गीयांचे बेहाल होत असून प्रामुख्याने गृहिणींचे घरगुती बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. गेल्या दोन वर्षापासून कोरोनामुळे महागाई प्रचंड वाढली आहे. बाजारात स्टेशनरी होजिअरी कटलरी सर्व वस्तूंचे दर वाढलेले आहेत. शाकाहारी लोकांकरीता डाळ हे जीवनसत्वाचे स्त्रोत आहे. मात्र डाळीचे भाव गगनाला भिडल्याने सामान्य माणसाच्या जेवणातून डाळी हद्दपार झाली असल्याचे दिसून येत आहे. पूर्वी आठवडी बाजारातून भाजीपाला आणायचा झाल्यास ५० ते १०० रुपयात मोठी पिशवी भरून यायचा. मात्र आता पाचशे रुपयातही पिशवी भर बाजार येत नसल्याचे सर्वसामान्य नागरिक सांगतात. सध्या टमाटरचे भाव उत्तरले असले तरी अद्रक कांद्यासह इतर भाजीपाल्यांचे भाव तेजीत असल्याचे दिसून येत आहे. मागील वर्षी पाऊस जास्त असल्याने त्याचा महागाईवर परिणाम झाला होता.

तर यावर्षी अपुऱ्या पावसामुळे महागाईवर परिणाम झाला असल्याचे काही जाणकार लोक सांगतात. यावर्षी अधिक मासामुळे सण उत्सव एक महिना पुढे लांबल्याने सप्टेंबर ऑक्टोबर हे सणांचे महिने असून यामुळे या महिन्यात महागाई आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे तर यावर्षी अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होऊन नुकसान सोसावे लागणार असल्याचे शेतकरी सांगत आहे. डाळीसह भाजीपालाही महागल्याने रोजच्या स्वयंपाकात भाजी कशाची करावी हा प्रश्न आता सामान्य गृहिणी पुढे निर्माण झाला आहे. परिणामतः सामान्य कुटुंबात एका सांजिला केलेली भाजी चार सांजा खावी लागत असल्याचे गृहिणी सांगत आहे.



# ४४ वे भव्य तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय, मोराणे येथे संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** शिक्षण विभाग पंचायत समिती, धुळे, धुळे तालुका मुख्याध्यापक संघ व गणित अध्यापक संघ तसेच इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित, श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय, मोराणे प्र. नेर येथे ४४ वे भव्य तालुका स्तरीय विज्ञानप्रदर्शन अतिशय दिमाखदार वातावरणात उद्‌घाटन धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता साहेब यांच्या हस्ते झाला . कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी श्री.बाळासाहेब भदाणे,अध्यक्ष, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान,बोरकुंड होते. प्रमुख अतिथी म्हणून ,मा.मोहनजी देसले, शिक्षणाधिकारी प्राथ.व माध्य.जि.प.धुळे,मा.सौ.शालिनीताई बाळासाहेब भदाणे,सचिव,इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान,बोरकुंड आणि श्री.देवेन्द्रजी माळी,उपसभापती,पं.स.धुळे हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे कार्यक्रमास प्रकल्प अधिकारी मा.श्री. प्रमोद पाटील,उपशिक्षणाधिकारी एस.ई.बागुल,श्रीमती सुरेखा देवरे, गटशिक्षणाधिकारी,श्री.संजीव पी. विभांडिक, श्री. एम.जे.सोनवणे, श्री.संजीव एच.पाटील,श्री.आर.जे. पाटील,श्री. प्रवीणकुमार लाडे,श्री. राजीव पटेल,श्री. हर्षल जे.पवार,श्री. डी.पी.पाटील उपस्थित होते. धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता साहेब यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांच्यामधील वैज्ञानिक दृष्टिकोन,अनिष्ट अंधश्रद्धा निर्मूलन विषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात मा. श्री. बाळासाहेब भदाणे यांनी सांगितले कि लहान वयापासून विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मिती व सृजनशीलतेची आवड निर्माण करून विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव मिळावा व विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण होण्यासाठी शालेय विज्ञान प्रदर्शन महत्त्वाची भूमिका निभावतात.शिक्षणासोबत मुलांवर लहानपणापासून अभ्यासाचे कुठलेही दडपण किंवा ताणतणाव न देता त्यांच्या बौद्धिक विकासा सोबत शारीरिक व मानसिक विकास करणे गरजेचे आहे यासाठी शालेय स्तरावर विविध शालेय उपक्रमातून त्यांच्या कलागुणांना वाव देत आवडीच्या क्षेत्रात पुढे जाण्याची संधी मिळते .सदर विज्ञान प्रदर्शनाचे प्रास्ताविक श्रीमती सुरेखा देवरे गट शिक्षणाधिकारी पं. स. धुळे यांनी केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. एस.बी.बेहेरे सर यांनी केले.तसेच सूत्रसंचालन जे.बी.बोरकुंडकर यांनी केले व आभार प्रदर्शन उपप्राचार्य श्री.के.के.बाविस्कर सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शहर गणित विज्ञान अध्या.संघाचे अध्यक्ष श्री. प्रवीणकुमार लाडे व ग्रामीणचे अध्यक्ष श्री. राजीव पटेल, सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. एस.बी.बेहेरे सर ,उपप्राचार्य श्री. के.के.बाविस्कर सर, पर्यवेक्षक श्री. एस.बी. गरुड सर तसेच सर्व विज्ञान शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी परिश्रम घेतले.

# सहाव्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन!

आधुनिक केसरी न्यूज

**शिरूर कासार :** एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक, समीक्षक श्री अनंत कराड यांच्या मार्गदर्शनात बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील भागवत बाबा साहित्य नगरी, गोमळवाडा येथे एकता फाउंडेशन शिरूर कासार आयोजित सहाव्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन होत आहे. महाराष्ट्रातील जेष्ठ साहित्यिक, सुप्रसिद्ध कवी, कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असून दिनांक २१ व २२ डिसेंबर या दोन दिवस चालणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात श्रोत्यांना साहित्य-सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी लाभणार आहे. दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी ठीक आठ वाजता सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत हनुमान मंदिर-सावता माळी महाराज मंदिर ते वै.भागवतबाबा साहित्य नगरी या मार्गे ग्रंथ दिंडी निघणार असून त्यानंतर संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिक तथा महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री बाबा भांड यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते श्री अजिनाथ गवळी यांच्या निगराणीत हे संमेलन संपन्न होत असून ह.भ.प. महंत श्री भानुदास महाराज शास्त्री, बीड जिल्हा पोलीस अधीक्षक मा.नंदकुमार ठाकूर, बीड जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनात उद्घाटन कार्यक्रमानंतर एकता गौरव पुरस्कार सन्मान सोहळ्यामध्ये एकता जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ विचारवंत दिवंगत प्रा.श्री हरी नरके यांना देण्यात येणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार आणि दर्जेदार लेखकांना साहित्य पुरस्कार देऊन यथोचित सन्मान केला जाणार आहे. या प्रसंगी जेष्ठ कवी श्री अनंत कराड यांच्या 'हे रामा' या कविता संग्रहाचे प्रकाशन होणार आहे.

त्यांतर पहिल्या दिवशी व्यंगचित्रकार श्री सुहास पालीमकर, श्री दिपक महाले यांचे 'व्यंगचित्र प्रदर्शन', डॉ.अनिलसिंह तिवारी यांचा 'महाराष्ट्राची लोकधारा' आणि 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमांतर्गत मा.विलास सिंदगीकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच दुपारी जेष्ठ पत्रकार मा.महेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रामीण भागाच्या विकासात प्रसार माध्यमांची भूमिका' या विषयावर परिसंवाद होणार असून यामध्ये पत्रकार सर्वश्री मा.प्रमोद कुलकर्णी (दै.तरुण भारत), मा.दत्ता देशमुख (दै. सकाळ) आणि मा.सुरेश जाधव (न्यूज 18 लोकमत) हे मान्यवर आपली भूमिका मांडतील. त्यानंतर जेष्ठ कवयित्री प्रा.डॉ.संगीता घुगे (नांदेड) यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रित कवींचे कवी संमेलन होईल. सायंकाळी ह.भ.प.श्री प्रणव महाराज यांचे शास्त्रीय गायन आणि गोमळवाडा केंद्रातील शालेय कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिल्या दिवसाचा शेवट होईल.




दि.२२ डिसेंबर रोजी सकाळी रक्तदान शिबीर झाल्यानंतर जेष्ठ साहित्यिक मा.अंबादास केदार सरांच्या अध्यक्षतेखाली सर्वश्री जमीर शेख, डॉ.बबनराव महामुने, जी.जी. कांबळे, चंद्रशेखर कळसे, संगीता होळकर-औटे, सानिका गुजर, कार्तिकी नेटके यांचे कथाकथन होणार आहे. त्यानंतर दुपारी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मा.दिपा मुधोळ-मुंढे यांच्या अध्यक्षेतेखाली 'ग्रामीण भागातील वाढते बालविवाह व त्यावरील उपाय' या विषयावर परिसंवाद होणार असून यावेळी मा.मनीषा तोकले, मा.तत्वशिल कांबळे आदि मान्यवर आपले विचार मांडतील. त्यानंतर डॉ.प्रकाश वाकळे यांच्या अध्यक्षतेखाली या संमेलनातील निमंत्रितांचे 'दुसरे कवी संमेलन' होणार आहे. या संमेलनाचा समारोप समारंभ जेष्ठ पत्रकार श्री गोरख खेडकर (दै. लोकाशा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून यामध्ये ठराव वाचन आणि विविध संत-महंतांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा होणार आहे. शेवटी सायंकाळी गोमळवाडा केंद्रातील शालेय कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने या दोन दिवसीय मराठी साहित्य संमेलनाचे सूप वाजणार आहे. तरी या दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाचा शिरूर कासार-गोमळवाडा पंचक्रोशीतील मंडळींनी आणि महाराष्ट्रातील तमाम साहित्यिक रसिकांनी आस्वाद घेण्याचे आवाहन एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री अनंत कराड, स्वागत अध्यक्ष मा.श्री अजिनाथ गवळी, लेखक, लेखक-समीक्षक प्रा. डॉ.विठ्ठल जायभाये, समस्त ग्रामस्थ गोमळवाडा तसेच एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य केंद्रीय कार्यकारिणी यांनी केले आहे.



संत गाडगेबाबा महाराज पुण्यतिथी निमित्त डोंबिवली पश्चिमेस दीनदयाळ रोड, घनश्याम गुप्ते रोड येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त च्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय (घाटकोपर झोन) आणि डोंबिवली सेंटरचे आयोजक बी. के. केशव भोईर आधी उपस्थित होते.

## शिवतेज कामगार संघटनेने कामगारांना मिळवून दिली भरघोस पगारवाढ, इतर भत्ते

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख, कार्यसम्राट माजी आमदार व शिवतेज कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहरशेठ भोईर व प्रमुख सल्लागार व तालुका संघटक बी एन डाकी यांच्या नेतृत्वाखाली तसेच सततचा पाठपुरावा योग्य मध्यस्थी व मार्गदर्शनामुळे अमेया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, खोपटे मधील पर्लफेल्ट सर्वेयर मधील सर्वे कामगारांना भरघोस पगारवर व विविध भत्ते मिळवून दिले आहेत यामध्ये अमेया कंपनीच्या सर्वेयरच्या ९ वर्षाच्या इतीहासात प्रथमच ७००० रु ची भरघोस पगार वाढ, प्रथमच पहील्या वर्षी ८०% , दुसऱ्या वर्षी १० % व तिसऱ्या वर्षी १०% पगारवाढ तसेच प्रथमच लीव ईन कॅश, ओटी डब्बल, इन्शुरन्स डेथ पॉलिसी व इतर सुविधा शिवतेज कामगार संघटनेच्या माध्यमातून मिळवून दिल्या व या सर्व सुविधा चालू झाल्या याबद्दल संस्थापक अध्यक्ष माजी



आमदार मनोहरशेठ भोईर व सरचिटणीस महेंद्र सावंत यांचा सर्व कामगारांच्या तर्फे जाहीर सत्कार मंगळवार दिनाकं 19 डिसेंबर 2023 रोजी करण्यात आला. या वेळी शिवतेज कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष रविंद्र पाटील,अध्यक्ष सतिश म्हात्रे, उपाध्यक्ष प्रतिक म्हात्रे,सल्लागार मिथुन भगत, छगन ठाकुर, मंगेश डाकी, रोहीत भगत, अक्षय ठाकुर, राकेश म्हात्रे, कुलदीप भगत,महेंद्र म्हात्रे यांनी कामगारांच्या वतीने माजी आमदार मनोहर भोईर व सरचिटणीस महेंद्र सावंत यांचा सत्कार केला.

## नरेंद्राचार्यजी महाराज यांचा आशेवाडी येथे दीक्षा, प्रवचन व दर्शन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** अनंत श्री विभूषित जगद्गुरू अमानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी आशेवाडी येथील रामशेज किल्ल्याजवळील उत्तर महाराष्ट्र उपपीठ येथे भव्य समस्या मार्गदर्शन, दिक्षा, प्रवचन व दर्शन सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन इगतपुरीतील भक्तांनी केले आहे. विविध प्रकारे भक्तांच्या वतीने कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार केला जात आहे. अध्यात्म, विज्ञान व व्यवहार या त्रिसूत्रीची सांगड घालून जीवन कसे जगावे, याबाबत मार्गदर्शन प. पू. - जगद्गुरूंच्या अमृत वाणीतून सर्वांना लाभणार आहे. त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन, जीवनात येणाऱ्या अनेक समस्या यावरही सखोल मार्गदर्शन होणार आहे. संस्थानाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. राष्ट्रीय महामार्गावर संस्थानाच्या वतीने दर पन्नास किलोमीटरवर मोफत रुग्णवाहिका सेवा सुरू आहे. अपघात ग्रस्तांसाठी विनामूल्य तीस रुग्णवाहीका महामार्गावर कार्यरत असून त्यापैकी इगतपूरी तालुक्यात दोन रुग्णवाहीका मोफत सेवा देत आहे. ब्लड इन नीडच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तात्काळ रक्त पुरवले जाते. तरुणांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने व्यवसाय मार्गदर्शन केले जाते. यांसारखे विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबविले जातात. सामाजिक कार्य व सोबतच आध्यात्मिक ज्ञान देणारे जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम हा दोन्ही दिवस सकाळी नऊ वाजल्यापासून चालू होत आहे. येणाऱ्या भाविकांच्या सर्व सोयीच्या दृष्टीने भव्यदिव्य मंडप उभारणीचे काम युद्धपातळीवर चालू आहे. तीन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जगद्गुरूश्री येत आहेत. म्हणून सर्व भाविकांच्या मनात अतिशय उत्साहाचे वातावरण असून, माऊलींच्या दर्शनाची सर्वांना आस लागली आहे. गावोगाव तळागाळात प्रचंड मोठ्या प्रमाणात जोरदार प्रचार - प्रसार सुरू आहे. २२ डिसेंबर रोजी उपासक असलेल्यांना स्वामींच्या उपस्थितीत साधक दीक्षा दिली जाणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून प.पू. जगद्गुरू श्रींच्या प्रवचनाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उत्तर महाराष्ट्र उपपीठाच्या वतीने करण्यात येत आहे.





## स्वच्छता मोहीम राबवून गाडगेबाबांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** स्वच्छतेचे महाउपासक तथा राष्ट्रीय प्रबोधनकार संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शालेय गावस्वच्छता मोहीम राबवून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, चांदोबा झिंझाडे, मारोती चक्रधर, राष्ट्रपाल गच्चे, विवेक गोडबोले, हैदर शेख, मनिषा गच्चे आदींची उपस्थिती होती. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मयुरी गोडबोले, गीतांजली गोडबोले, सुप्रिया गच्चे, तेजल शिखरे, अक्षरा शिंदे, दीपाली गोडबोले, सोनाली गोडबोले, दीपाली गोडबोले, कल्याणी शिखरे, वैभवी शिखरे यांनी गटाचे नेतृत्व करीत शालेय गावस्वच्छता मोहीमेचे नेतृत्व केले. यात शालेय परिसर, मुख्य रस्ता, फलाटवाडी, बुद्ध विहार परिसर, हनुमान मंदिर परिसर येथे स्वच्छता करण्यात आली.

## श्रामणेर प्रशिक्षण केंद्र जागतिक दर्जाचे होणार : शास्त्रज्ञ डॉ. सिद्धार्थ जोंधळे

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने मोठ्या प्रमाणावर धम्मचळवळीचे कार्य सुरू आहे. श्रामणेर दीक्षा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तकालय, धम्मदान आणि धम्मसंदेश यात्रा, जगातील बौद्ध राष्ट्रांतील धम्मसहल, विविध धम्मसंस्कार, पौर्णिमोत्सव आदी कार्यक्रमांमुळे जगातील बौद्ध राष्ट्रांशी धम्मसंधान साधल्या जात आहे. येत्या काळात हे श्रामणेर प्रशिक्षण केंद्र जागतिक दर्जाचे होणार ह्यात शंका नाही असे प्रतिपादन येथील शास्त्रज्ञ डॉ. सिद्धार्थ जोंधळे यांनी केले. ते मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त आयोजित पौर्णिमोत्सव कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्रशिक्षण केंद्राचे संचालक, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो, भिख्खू संघ, एस. एन. गोडबोले, सा. ना. भालेराव, प्रा. एस. एच. हिंगोले, टी. पी. वाघमारे, पीआय बी. एम. मल्हारे, प्रज्ञाधर ढवळे, थोरात बंधू, सिद्धार्थ थोरात, डॉ. साहेबराव खाडे, ॲड. रामानंद सावंत आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर याचनेवरुन भिक्खू संघाने त्रिसरण पंचशील दिले. मार्गशीर्ष पौर्णिमेचे औचित्य साधून पौर्णिमोत्सव कार्यक्रमांतर्गत सकाळपासून परित्राणपाठ, धम्मध्वजारोहण, त्रिरत्नवंदना, बोधीपुजा, सूत्तपठण, ध्यानसाधना, धम्मदेसना व्याख्यान, भोजनदान, आर्थिक दान पारमिता आदी कार्यक्रम संपन्न



झाले. दरम्यान कुलदीप राक्षसमारे यांचे लाठीकाठी प्रशिक्षण प्रात्यक्षिक सादर झाले. शहरातील श्रद्धा कॉलनीतील बौद्ध उपासिकांकडून भिख्खू संघ आणि उपस्थित बौद्ध उपासक उपासिकांना भोजनदान दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रज्ञाधर ढवळे यांनी केले तर आभार प्रा. एस. एच. हिंगोले यांनी मानले. कार्यक्रमादरम्यान भिख्खू संघाची धम्मदेसना संपन्न झाली. तसेच मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. भिख्खू संघाच्या आशिर्वचनाने कार्यक्रमाची सांगता झाली. तसेच शाहीर सुभाष लोकडे आणि संचाचा बुद्ध आणि भीमगितांचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागोराव नरवाडे, आप्पाराव नरवाडे, अनिता नरवाडे, सुरेखा नरवाडे, दलित खाडे, दत्ता खाडे, श्रावण खिल्लारे, शेषराव खाडे, दीपक ढगे, मुंजाजी खाडे, आशा खाडे, माजी सैनिक संभाजी सावंत, किशन सावंत, बाबूराव सावंत मंगेश राऊत आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विविध ठिकाणच्या बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# चार भिंतीबाहेर जाऊन शिकवला 'आनंदाचं झाड' पाठ

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** आनंददायी शिक्षण फक्त चार भिंतीतच मिळते असे नाही तर चार भिंतीच्या मर्यादा ओलांडून दिले गेलेले शिक्षण तितकेच प्रभावी होते. उत्तम शिक्षणासाठी फक्त साधने असून चालत नाही तर बालकाच्या सभोवताली असलेल्या परीसरातील विविध परिचित आणि अपरिचित घटकांचा समावेश त्याच्या शैक्षणिक अनुभवात होणे गरजेचे आहे.या शैक्षणिक विचाराची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती मिळावी म्हणून जिल्हा परिषदेच्या कुरणपूर येथील विद्यार्थ्यांना इयत्ता चौथीच्या भाषेच्या बालभारती या पाठयपुस्तकातील लिला शिंदे लिखित 'आनंदाचं झाड ' हा पाठ प्रत्यक्ष शेवग्याच्या झाडाखाली जाऊन शिकवण्यात आला. शाळेतील उपक्रमशील शिक्षक रज्जाक शेख यांना ही कल्पना सुचली. त्यासाठी शाळेजवळ असलेल्या ग्रामपंचायत आवारातील शेवग्याच्या बहरलेल्या झाडाच्या खाली जाऊन विद्यार्थ्यांना शेवग्याची फुले,पाने आणि लगडलेल्या शेंगा या गोष्टी आपल्या आरोग्यासाठी किती आनंद देणाऱ्या व लाभदायक आहेत हे पुस्तकातील लेखिकेच्या अनुभवांचा संबंध लावून सांगण्यात आले. शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांचे रंग,फुलांवर बसलेली रंगीबेरंगी फुलपाखरे,हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर भरलेला पक्षांचा मेळा,झाडावर अन्न शोधायला आलेले कीटक ही सर्व माहिती देण्यात आली. झाडे आपल्याला फळे,फुले,पाने,सावली आणि लाकूड देतात.पक्षांना आसरा देतात.त्याचबरोबर हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी मोलाची कामगिरी करतात ही माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी झाडाखाली बसून या पाठाच्या मुकवाचन व प्रकटवाचनाचा मनसोक्त आनंद लुटला.



## बालाजी डेरी उद्घाटनप्रसंगी विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** अंजना प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष स्मिता ताई पल्हाळ यांच्या बालाजी डेरी या नवीन व्यवसायाचा आज उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे सौ. जयश्री ताई येवले ( युवा किर्तनकार) यांच्या हस्ते हे उद्घाटन पार पडले. तसेच ताईंनी आपल्या प्रवचनाद्वारे गाई संगोपना बद्दल उपस्थित गावकरी मंडळी यांना मार्गदर्शन केले.

बालाजी डेरी चा मूळ उद्देश हा परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे व शुद्ध आणि सेंद्रिय दूध हे ग्राहकापर्यंत पोहचवणे आहे, असे प्रतिपादन स्मिताताई यांनी केले.

या उद्घाटन प्रसंगी, श्री. शंकरराव पल्हाळ ( संस्थापक, अंजना प्रतिष्ठान ), श्री. उदयकाका मुळे, श्री. अक्षय महाराज येवले, श्री. शालिवान महाराज वाजे, श्री. लक्ष्मण काका रावते, श्री. जनकाका गवळी, श्री. बबन साठे, श्री. अंकुश जाधव , श्री. ज्ञानेश्वर जाधव, श्री. लक्ष्मणराव पल्हाळ, श्री.संतोष दांगोडे व पंचकृशितील शेतकरी उपस्थित होते.



## भोईर आळी मित्रमंडळाच्या ३० वा वार्षिक कार्यक्रमात विविध स्पर्धांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सन १९९३ रोजी स्थापन करण्यात आलेल्या उरण तालुक्यातील नवीन शेवा गावातील भोईर आळी मित्र मंडळाचा ३० वा वार्षिक कार्यक्रम १७ व १८ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. या वेळी श्री सत्यनारायण ची महापुजा आयोजित करण्यात आली होती. तर विविध क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व महिलांसाठी चला खेळ खेळूया पाठणीचा हया स्पर्धा व प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील यांच्या सौजन्याने जल्लोष सुवर्ण युगाचा हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण समारंभासाठी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. त्याच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले, तसेच मार्गदर्शन करताना माजी आमदार मनोहरशेठ भोईर म्हणाले की, भोईर आळी मित्र मंडळाला आज तीस वर्षे पूर्ण झाली आहेत.आणि त्यांनी या वर्षात विविध असे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपलेली आहे आणि मला खात्री आहे की हा मंडळ निश्चितच पन्नास वर्षे पूर्ण करेल, म्हणून माझे जे जे सहकार्य तुम्हाला लागेल ते मी तुम्हाला देईल असे आश्वासित केले, यावेळी उपतालुकाप्रमुख व गावचे अध्यक्ष कमलाकर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मंडळाचे संस्थापक सदस्य व उरण संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे यांनी केले.

या कार्यक्रमास द्रोणागिरी शहरप्रमुख जगजीवन भोईर, एम आय पी एल चे व्यवस्थापक श्री दयाळशेठ भोईर, सरपंच सोनल घरत, उपसरपंच कुंदन भोईर, ग्रामपंचायत सदस्य मयुरी घरत, रेखा म्हात्रे, सतिश सुतार, भावना भोईर, अशोक दर्णे, प्रणिता भोईर, वैशाली म्हात्रे शाखाप्रमुख शैलेश भोईर,पंकज सुतार, गावचे खजिनदार भारत भोईर, सेक्रेटरी शेखर पडते, महेश म्हात्रे, अशोक म्हात्रे व मान्यवरा उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भोईर आळी मित्र मंडळाचे कार्यकर्ते परशुराम ठाकूर, अजय सुतार, जनार्धन भोईर,एकनाथ भोईर, हिराजी ठाकूर, मोरेश्वर भोईर,दामाजी भोईर, विजय म्हात्रे, लहू पाटील, काशिनाथ भोईर, महिला कार्यकर्त्या वैशाली भोईर, प्रतिभा भोईर, सुरेखा भोईर,शुभांगी भोईर, नयना ठाकूर, रंजना म्हात्रे, वंदना पाटील, देवयानी भोईर, सोनी भोईर व भोईर आळी ग्रामस्थ यांनी मेहनत घेतली.

## परतूर पोलिसांकडून शहरात अचानक नाकाबंदी; विनानंबर २६ मोटार सायकल केल्या जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरात पोलिसांनी अचानक ठिकठिकाणी नाकाबंदी करून विना नंबरच्या २६ मोटार सायकल जप्त केल्याची कारवाई सोमवारी रात्री सात वाजता केली आहे. पोलिस निरीक्षक एम.टी. सुरवसे यांनी गेल्या आठवड्यापासून अवैध धंदे विरुद्ध कारवाई करण्याची मोहीम हात घेत अनेकावर गुन्हे दाखल केले आहेत. तर सोमवारी सात वाजता रात्री अचानक मुख्य रस्त्यावर चौकात ठिकठिकाणी पोलिसांनी नाका बंदी केली. त्यात विना क्रमांकाच्या दुचाकी, वाहन परवाना नसलेले चालक यांच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. तसेच जप्त केलेल्या दुचाकी मालकांनी कागदपत्राची पडताळणी केल्या शिवाय मोटारसायकल सोडणार नसल्याचे पोलिस निरीक्षक एम.टी. सुरवसे यांनी सांगितले आहे. तसेच या पुढे सुद्धा पोलिसांची शहरात अशीच कारवाई पुढे करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या मोटार सायकला नंबर प्लेट टाकाव्या नसता पोलीस कारवाईला सामोरे जावे लागत फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोनि सुरवसे यांनी दिला आहे. या पोलीस कारवाईने दुचाकी चालकात एकच खळबळ उडाली आहे. या पोलिसांच्या नाकाबंदी कारवाईत पोलीस निरिक्षक एम.टी. सुरवसे, पोलिस उपनिरीक्षक यु.व्ही. चव्हाण, उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, पोलीस कर्मचारी गोविंद पवार, दीपक आडे, डी.जे. शिंदे, विजय जाधव, विकास घाडगे, सुनील पवार, ज्ञानेश्वर वाघ यांच्यासह आदीं पोलीस कर्मचारी यांनी कारवाई केली आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर